# महाराष्ट्र विधानपरिषद

## चौथे अधिवेशन, २०१७

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**मंगळवार, दिनांक १२ डिसेंबर, २०१७ / अग्रहायण २१, १९३९ (शके)**

| | |
|---|---|
| **(१) महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२) परिवहन, खारभूमी विकास मंत्री** | |
| **(३) कृषी, फलोत्पादन मंत्री** | |
| **(४) सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** | |
| **(५) पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ८१**

---

### राज्यातील सर्व पुलांचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन दुरूस्ती करण्याबाबत

**(१) * ३४८४८ श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.हेमंत टकले, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.सुनिल तटकरे, श्री.ख्वाजा बेग, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामराव वडकुते, श्री.रविंद्र फाटक, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.प्रकाश गजभिये, श्रीमती स्मिता वाघ, श्री.जयवंतराव जाधव, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २९०० जुन्या पुलांचे "स्ट्रक्चरल ऑडीट" करून किती लहान व मोठ्या पुलांची दुरुस्ती वा पुनर्बांधणी करण्यात आली आहे, त्याचप्रमाणे १ हजार १२३ पुलांच्या दुरुस्तीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने वर्षाचा कालबध्द कार्यक्रम तयार केला असून पुरामध्ये पुल वाहून जाण्याच्या धोकादायक घटनेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी शासनाने पुलांवर "सेन्सर" बसविले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याचे स्वरुप काय आहे, उक्त १ हजार १२३ पुलांच्या दुरुस्तीकरिता किती खर्च येणार आहे, तसेच दुरुस्तीकरिता निधी कशाप्रकारे उभारण्यात येणार आहे, सेन्सर बसविण्याची कारणे काय आहेत व त्यानुषंगाने सेन्सर बसविण्याच्या कार्यवाहीपूर्तीची सद्यःस्थिती काय आहे,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील ब्रिटीशकालीन व सुरक्षा मुदत संपलेल्या सर्व पुलांचे स्ट्रक्चरल ऑडीट करुन दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) अंशत: खरे आहे,

राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रस्त्यांवर १३१५१ पुल असून त्यांची नियतकालीन तपासणी करण्यात आली आहे. तपासणीमध्ये ज्या पुलांमध्ये संरचनात्मक दोष आढळून आले अशा ४४४ पुलांचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आले आहे. पुलांच्या दुरुस्तीसाठी सुमारे रुपये ७९२ कोटी खर्च अपेक्षित आहे. उपलब्ध निधी तसेच प्राधान्यक्रम यानुसार दुरुस्तीची कार्यवाही योजनेत्तर रस्ते व पुल देखभाल दुरुस्ती अनुदानातून हाती घेण्यात आली आहे.

एकूण २७० पुलांसाठी पूर पातळी धोक्याच्या पातळीवर गेल्यास नियंत्रण कक्षामध्ये सूचना मिळण्यासाठी पूर पातळी निदर्शक इलेक्ट्रॉनिक सेन्सर बसविण्यात आले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात कापूस व सोयाबीन पिकांवर विषारी किटकनाशक फवारणी केल्यामुळे शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्याबाबत

**(२) * ३५३९० श्री.धनंजय मुंडे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अनिल भोसले, श्री.ख्वाजा बेग, डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.जनार्दन चांदूरकर, डॉ.अपूर्व हिरे, प्रा.अनिल सोले, श्री.रविंद्र फाटक, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्रीमती विद्या चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील, आर्कि.अनंत गाडगीळ, श्री.परिणय फुके, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.गोपिकिशन बाजोरीया, श्री.तानाजी सावंत, श्री.मोहनराव कदम, श्रीमती स्मिता वाघ :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विदर्भातील विशेषत: यवतमाळ, अकोला, बुलढाणा, वर्धा, नागपूर, चंद्रपूर व धुळे या जिल्हयात तसेच, मराठवाडा व खानदेशात बी.टी. कापूस आणि सोयाबीन पिकांवर किटकनाशकांची फवारणी करतांना विषारी रसायणाची बाधा झाल्याने विदर्भात माहे सप्टेंबर-ऑक्टोबर मध्ये ३२ शेतकरी व शेतमजूरांचा मृत्यू झाला, यवतमाळ जिल्हयात माहे जुलै ते ऑक्टोबर, २०१७ या कालावधीमध्ये कापूस व सोयाबीन या पिकांवर किटकनाशक फवारणी करताना विषारी रसायनामुळे ४० शेतकऱ्यांचा मृत्यू होऊन ३६९ शेतकऱ्यांना विषबाधा झाली व शेतमजूरांना अंधत्व आल्याच्या व मेंदू आजार झाल्याच्या गंभीर घटना घडल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, विषबाधा प्रकरणात तलाठी, ग्रामसेवक, आरोग्य अधिकारी, कृषी सेवक या गाव प्रशासनातील यंत्रणेच्या निष्काळजीपणामुळे शेतकरी व शेतमजुरांचा मृत्यू झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यवतमाळ जिल्हयात किटकनाशक फवारणीने विषबाधा होवून मृत झालेल्या तसेच अंधत्व व मेंदू आजार झालेल्या शेतकरी व शेतमजुरांच्या कुटूंबियांना/ वारसांना रुपये ५ लाखापर्यंत आर्थिक मदत देण्याबाबतचे निवेदन श्री.रविंद्र नालमवार यांच्या अध्यक्षतेखाली एका संघटनेने मा.कृषी राज्यमंत्री यांना दिनांक ४ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, राज्यात किटकनाशक व्यवस्थापन कायदा मंजूर करावा, अशा मागणीचे प्रस्ताव शेतकरी मिशनचे अध्यक्ष यांनी माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मा.कृषी मंत्री यांच्याकडे दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दोषी कंपन्या व विक्रेते यांच्यावर कारवाई करण्याबाबत तसेच, विषारी किटकनाशक फवारणीमुळे मृत शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना "गोपिनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा" योजनेंतर्गत किती आर्थिक मदत देण्यात आली वा त्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.पांडुरंग फुंडकर :** (१) राज्यात विदर्भातील विशेषत: यवतमाळ, अकोला, बुलढाणा, वर्धा, नागपूर, चंद्रपूर व धुळे या जिल्हयात तसेच, मराठवाडा व खानदेशात बी.टी. कापूस व सोयाबीन या पिकांवर जुलै ते ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत किटकनाशकांची फवारणी करताना एकूण ५१ शेतमजूर/ शेतकरी यांचा मृत्यू झाल्याचे शासनाच्या निदर्शनास आलेले आहे.

यवतमाळ जिल्हयात जुलै ते ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत किटकनाशकांची फवारणी करताना विषबाधा होवून २१ शेतमजूर/शेतकऱ्यांचा मृत्यू झाल्याचे तर एकूण ७८३ शेतमजूर/शेतकऱ्यांना विषबाधा झाल्याचे निदर्शनास आलेले आहे.

(२) गृह, कृषी, सार्वजनिक आरोग्य, ग्रामविकास व वन विभागाच्या अधिपत्याखालील प्रशासनातील क्षेत्रिय पातळीवरील अधिकाऱ्यांनी विषबाधेबाबतचा अहवाल विहीत प्रपत्रात वरिष्ठांना सादर केला नाही, हे खरे आहे.

(३) यवतमाळ जिल्हयात किटकनाशक फवारणी करताना विषबाधा होवून मृत झालेल्या शेतमजूर/शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना रुपये ५ लाखापर्यंतची आर्थिक मदत देण्याची मागणी श्री.रविंद्र नालमवार, अध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, आर्णी तालुका यांनी दिनांक ०४/१०/२०१७ रोजीच्या मा.राज्यमंत्री (कृषी) यांना उद्देशून लिहिलेल्या निवेदनाद्वारे केलेली आहे, हे खरे आहे.

(४) अशा प्रकारची मागणीचे निवेदन प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(५) विषबाधा प्रकरणाची चौकशी करण्याकरीता राज्य शासनाने "विशेष तपास पथकाची" स्थापना केलेली आहे.

किटकनाशक कायद्यामधील तरतुदीनुसार दोषी कंपन्या व विक्रेते यांच्यावर कोर्ट केसेस, पोलीस केसेस दाखल करण्यात आलेल्या आहेत. तसेच, परवाना निलंबन, परवाना रद्द, किटकनाशकांची जप्ती व विक्री बंद आदेश यासारखी कारवाई सुध्दा करण्यात आलेली आहे.

अद्यापपर्यंत विषारी किटकनाशकांमुळे विषबाधा होऊन मृत झालेल्या १८ शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजनेंतर्गत रुपये २ लाख रकमेचा विमा संरक्षणाचा लाभ देण्यासाठी प्रस्ताव विमा कंपनीकडे दाखल करण्यात आलेले आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जयगड ते दाभोळ (जि.रत्नागिरी) या हिरानंदानी प्रकल्पास ग्रामस्थांनी विरोध केल्याबाबत

**(३) * ३५८८२ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जयगड ते दाभोळ (जि.रत्नागिरी) अशी हिरानंदानी प्रकल्पाची गॅस पाईपलाईन टाकली जाणार असल्याने या प्रकल्पाला चाफेरी येथील ग्रामस्थांनी विरोध केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकल्पाची कोणतीही माहिती न देता चाफेरीसह लगतच्या सुमारे साडेचार हजार शेतकऱ्यांना महसूल विभागाने नोटीसा बजावल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने या प्रकल्पाला होणारा विरोध लक्षात घेता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) रत्नागिरी तालुक्यातील १) नांदीवडे, २) कुणबीवाडी, ३) संदखोल, ४) चाफेरी, ५) कांबळेलागवण, ६) वाटद व ७) जमातवाडी या गावातील जमिनी गॅस पाईपलाईनसाठी जमीन वापर हक्क संपादनात येत आहेत. पेट्रोलियम व खनिज पाईपलाईन (जमीन वापराचा व हक्कांच्या संपादनाचा) अधिनियम, १९६२ मधील कलम ३ (१) अनुसार अधिसूचना केंद्र शासनाच्या राजपत्रात दिनांक २८/२/२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. राजपत्रात कलम ३ (१) अधिसूचना प्रसिध्द झाल्याने संबंधित शेतकऱ्यांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

याप्रकरणी संबंधित खातेदारांच्या दिनांक ९/८/२०१७, १०/८/२०१७ व ११/८/२०१७ रोजी सुनावण्या घेण्यात आल्या आहेत. त्यानंतर उक्त अधिनियमाच्या कलम ६ (१) अनुसार अधिसूचना केंद्र शासनाकडे राजपत्रात प्रसिध्दीसाठी पाठविण्याकरिता संपादन संस्थेकडे दिनांक २६/१०/२०१७ रोजी पाठविण्यात आली आहे.

-----------------

## पुणे शहरातील बहुविध चित्रपटगृह संकुलांनी करमणूक कर न भरल्याबाबत

**(४) * ३५२५१ श्री.अनिल भोसले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील ६ बहुविध चित्रपटगृह संकुल मालकांनी ४ वर्षापूर्वी शासनाने करमणूक कर सूट दिलेल्या कालावधीत प्रेक्षकांकडून वसूल केलेला रूपये ६८ कोटी ६५ लाखांचा कर अद्याप शासनास जमा केला नसल्यामुळे याबाबत शासनाने कोणताच निर्णय घेतला नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने करणमूक कर बुडविणाऱ्या ६ बहुविध चित्रपटगृह संकुल मालकांवर कारवाई करून सदर कर वसूल करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) व (२) प्रश्नाधीन बहुविध चित्रपटगृह संकुलांनी करमणूक शुल्क माफीच्या कालावधीत प्रेक्षकांकडून जी गैरवाजवी लाभाची रक्कम वसूल केली आहे, ती रक्कम शासनाकडे जमा करणेबाबत अपर जिल्हाधिकारी, पुणे यांनी प्रथम संबंधितांना नोटीसा दिल्या व तद्नंतर दिनांक ३०/०३/२०१३ रोजी आदेश दिले होते.

अपर जिल्हाधिकारी, पुणे यांच्या सदर आदेशांविरुध्द संबंधित बहुविध चित्रपटगृह संकुल मालकांनी विभागीय आयुक्त, पुणे यांच्याकडे दाखल केलेले अपील अर्ज विभागीय आयुक्त, पुणे यांनी दिनांक २९/०४/२०१४ च्या आदेशांन्वये अमान्य करुन अपर जिल्हाधिकारी, पुणे यांचे दिनांक ३०/०३/२०१३ चे वरील आदेश कायम केलेत.

सदर प्रकरणी संबंधित बहुविध चित्रपटगृह संकुल मालकांनी शासनाकडे दाखल केलेल्या अपिलांच्या अनुषंगाने तत्कालीन मा.मंत्री (महसूल) यांनी पारीत केलेल्या दिनांक ०१/०७/२०१४ च्या आदेशान्वये विभागीय आयुक्त, पुणे यांच्या आदेशास स्थगिती देण्यात आली होती. तथापि, दिनांक १९/०९/२०१७ च्या आदेशान्वये मा.मंत्री (महसूल) यांनी संबंधित अर्जदारांचे अपील अर्ज अमान्य करुन विभागीय आयुक्त, पुणे यांचे दिनांक २९/०४/२०१४ चे आदेश कायम केले आहेत. त्यानुसार, प्रस्तूत प्रकरणी क्षेत्रिय पातळीवर विहीत नियमांनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील टोल वसूली बंद करण्याबाबत

**(५) * ३४९६९ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, आर्कि.अनंत गाडगीळ, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.हरिसिंग राठोड, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे महामार्गावर म्हैसकर इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीला दिलेल्या कंत्राटानुसार टोलवसूलीची ठरलेली रक्कम पंधरा वर्षे पूर्ण होण्यापूर्वीच वसूल केली असून कंपनीने माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये रुपये तीन हजार कोटींची टोल वसूली केलेली असल्यामुळे कंपनीने रूपये ३४६ कोटी अधिक टोल वसुली वाहनधारकांकडून केली आहे, त्यामुळे सदर कंपनीला टोल वसूल करण्यास मनाई करण्याबाबत सामाजिक कार्यकर्त्यांनी शासनाकडे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने ठरलेल्या रक्कमेहून अधिक टोल वसुली करणाऱ्यांवर कारवाई करून सदर टोल वसुली बंद करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे :** (१) टोल वसूली करण्यास मनाई करण्याबाबत निवेदन सप्टेंबर, २०१७ शासनास प्राप्त झाले नाही. तथापि, याच आशयाची तक्रार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळास जानेवारी, २०१७ मध्ये प्राप्त झाली असून महामंडळाने दिनांक २२/०२/२०१७ रोजीच्या पत्रान्वये सविस्तर उत्तर दिले आहे.

(२) मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाची देखभाल व दुरुस्ती व राष्ट्रीय महामार्ग क्र. ४ चे चौपदरीकरणाच्या प्रकल्पाच्या सवलत करारनाम्यात दिनांक ९ ऑगस्ट, २००४ ते दिनांक ८ ऑगस्ट, २०१९ पर्यंत १५ वर्षाची पथकर वसुलीची तरतूद आहे. त्याप्रमाणे पथकर वसुली करण्यात येत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांसाठी अत्याधुनिक रुग्णालय उभारण्याबाबत

**(६) * ३४७०५ श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.दत्तात्रय सावंत, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.ख्वाजा बेग, श्री.प्रकाश गजभिये, श्री.बाळाराम पाटील :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात परिवहन विभाग व राज्य परिवहन महामंडळाच्या संयुक्त विद्यमाने राज्य परिवहन कर्मचाऱ्यांसाठी १०० खाटांची अत्याधुनिक रुग्णालय तसेच त्यांच्या पाल्यासाठी ऑटोमोबाईल व मेकॅनिकल अभियंता महाविद्यालय उभारण्याचा निर्णय शासनाने माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेतला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रुग्णालय व अभियांत्रिकी महाविद्यालय उभारण्यास व प्रत्यक्षात ते कार्यान्वित करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदर महाविद्यालय किती कालावधीत कार्यान्वित होणार आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१) होय.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने असा निर्णय घेतला आहे.

(२) व (३) सदरील प्रकल्पाची आखणी करण्यासाठी तज्ञ सल्लागार संस्थेची निवड करण्याची बाब विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कृषी विभागाच्या विभाजनामुळे कंत्राटी कर्मचारी बेरोजगार होणार असल्याबाबत

**(७) * ३५८५० डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील कृषी विभागाचे विभाजन होऊन मृद व जलसंधारण हा नवीन विभाग अस्तित्वात येण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या विभाजनामुळे कृषी विभागातील सुमारे साडे पाच हजार कंत्राटी कर्मचारी बेरोजगार होणार आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बेरोजगार होणाऱ्या सदर कर्मचाऱ्यांना इतर विभागात सामावून घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.पांडुरंग फुंडकर :** (१) ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दिनांक ३१/०५/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये मृद व जलसंधारण आयुक्तालयाच्या स्थापनेसह मृद व जलसंधारण विभागाच्या क्षेत्रिय यंत्रणेची फेररचना करण्यात आली आहे.

(२) कृषी विभागाच्या पूर्वीच्या व सध्याच्या प्रस्तावित आकृतिबंधामध्ये कंत्राटी कर्मचाऱ्यांचा समावेश नसल्यामुळे कृषी व मृद व जलसंधारण विभागाच्या विभाजनामुळे कंत्राटी कर्मचारी बेरोजगार होण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## लिंगदरी, माऊली, आडगांव (जि.औरंगाबाद) या मार्गावरील रस्त्यांच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(८) * ३५४०१ श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लिंगदरी, माऊली, आडगांव (जि.औरंगाबाद) या मार्गावरील रस्त्यांच्या कामात सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात रुपये ६० लाखांचा गैरव्यवहार झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर काम घाट कटींगचे (स्कील वर्क) असल्याने सुशिक्षित बेरोजगारांना न देता मजूर सहकारी संस्थेला देण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या कामाचे देयक माहे मार्च, २०१६ मध्ये काढले तर काम माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये करण्यात आले, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) प्रश्नाधीन कामासंदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दक्षता व गुणनियंत्रण मंडळामार्फत चौकशी करण्यात येत आहे.
(२) होय.

प्रश्नाधीन कामाच्या निविदांना दोन वेळेस प्रतिसाद मिळाला नाही. तिसऱ्या वेळी निम्नतम निविदाकारांनी अनामत रक्कम भरली नाही. सबब, सदर निविदा प्रक्रिया पूर्ण होऊ शकली नाही. त्यामुळे कामाचे भाग पाडून मजूर सहकारी संस्थांना काम देण्यात आले आहे.
(३) अधिक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांचेकडून प्राप्त झालेल्या अंतरिम अहवालानुसार अशी बाब आढळून आली नाही.

(४) अधिक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांचेकडून अंतरिम अहवाल प्राप्त झाला असून, अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर समुचित कार्यवाही करण्यात येईल.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यात परतीच्या पावसामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत

**(९) * ३५७२५ डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.हेमंत टकले, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात परतीच्या पावसात विदर्भ, खान्देश, मराठवाडा, कोकणासह नाशिक व रायगड जिल्ह्यासह इतर भागात पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झालेले असल्याने त्यासंदर्भात पंचनामे करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, कोकणातही परतीच्या पावसाने भात पिकांचे नुकसान झाल्याने कोकणात ओला दुष्काळ जाहीर करण्याची मागणी करण्यात आली असून लांबलेल्या पावसामुळे आंबा व काजु पिकांच्या उत्पादनावर परिणाम होत असल्याने कोकणातील आंबा व काजु उत्पादक शेतकरी संकटात सापडला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, परतीच्या पावसामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे करावेत असे आदेश मा.मुख्यमंत्री यांनी महसूल विभागास दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२), (३) व (४) दिनांक २७ ऑक्टोबर, २०१७ रोजीच्या शासनपत्रान्वये, ऑक्टोबर, २०१७ मध्ये परतीच्या पावसामुळे झालेल्या शेती व फळपिकांच्या नुकसानीचे पंचनामे करुन, पिकांच्या नुकसानीबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याबाबतच्या सूचना क्षेत्रिय अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य परिवहन महामंडळाच्या नाशिक शहरातील बससेवेच्या फेऱ्या सुरू करण्याबाबत

**(१०) * ३४८८१ श्री.जयवंतराव जाधव : तारांकित प्रश्न क्रमांक ३०९४७ ला दिनांक २४ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या** संदर्भात सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य परिवहन मंडळाच्या नाशिक शहर बससेवेच्या कपात केलेल्या फेऱ्या पूर्ववत सुरु करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक २८ ऑगस्ट, २०१७ रोजी वा त्यासुमारास शासनास निवेदने दिलेली आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नादुरुस्त बसेस व सक्तीच्या रजेच्या विरोधात राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांनी आक्रमक होवून दिनांक २२ ऑगस्ट, २०१७ रोजी नाशिक शहरातील बससेवा बंद पाडून आंदोलन केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नाशिक शहरातील शालेय विद्यार्थी, कामगार व प्रवाशांचे बससेवे अभावी होणारा त्रास दूर करण्यासाठी शहर बससेवेच्या फेऱ्या पूर्ववत सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१) व (२) होय.

(३) राज्य परिवहन महामंडळाद्वारा दिनांक १५/०६/२०१७ पासून नाशिक शहर वाहतूकीची १० नियते, १६० फेऱ्या व २०१५ कि.मी. तसेच भगूर ते महात्मानगर अशी फेरी सुरु करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई-गोवा महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम संथगतीने सुरू असल्याबाबत

**(११) * ३५७७३ श्री.किरण पावसकर, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.ख्वाजा बेग, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.विक्रम काळे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.सतिश चव्हाण, डॉ.सुधीर तांबे, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील, श्री.जयंत पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गाचे चौपदरीकरण करण्याची घोषणा शासनाने केली मात्र निधीअभावी या मार्गाचे काम अत्यंत संथगतीने सुरु असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चौपदरीकरणाच्या नावाखाली या महामार्गाची दुरवस्था झाली असून पनवेलपासून रत्नागिरीपर्यंत रस्त्यामध्ये पडलेल्या खड्डयांमुळे येथे दररोज अपघात होत असून गेल्या पाच वर्षात येथे ६०० लोकांचा मृत्यू झाला आहे. तर दोन हजारांहून अधिक प्रवासी गंभीर जखमी झालेले असल्याची नोंद आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुंबई-गोवा महामार्गाचे चौपदरीकरणाचे काम कंत्राटदार यांच्यामार्फत कशाप्रकारे केले जाते याची शहानिशा करुन या मार्गाच्या कामाला गती देवून निधी वितरीत करुन वेळेत पूर्ण करण्याच्यादृष्टिने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत प्रगतीत असलेल्या पनवेल ते इंदापूर हया ८४ कि.मी. राष्ट्रीय महामार्गाचे चौपदरीकरण रखडले आहे हे खरे आहे. इंदापूर ते झाराप हया ३६२ कि.मी. महामार्गापैकी कशेडी घाटातील ९ कि.मी. वगळता ३५३ कि.मी. महामार्गाच्या

चौपदरीकरणासाठी ९ पॅकेजसाठी निविदा निश्चिती झाली असून भूसंपादनाची कार्यवाही अंतिम टप्प्यात असून प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात करण्यात येत आहे. कशेडी घाटातील बोगद्यासह रस्त्यासाठी निविदा प्रक्रिया प्रगतीत आहे.
(२) पनवेल ते झाराप हया भागातील महामार्गावरील खड्डे भरण्याची कार्यवाही कंत्राटदार/सवलतकारामार्फत प्रगतीत असून १५ डिसेंबर, २०१७ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(३) कर्नाळा पक्षी अभयारण्यासाठी वन तथा पर्यावरण विभागाची परवानगी, काही भागातील भूसंपादनाच्या समस्या, तसेच कंत्राटदाराच्या आर्थिक समस्या इत्यादी वरील सर्व समस्यांचे निराकरण करुन चौपदरीकरणाच्या कामास गती देण्याच्यादृष्टीने केंद्र शासनाने One Time Fund Infusion Scheme च्या अंतर्गत प्रकल्पासाठी बांधकामाच्या प्रगतीनुसार निधी पुरविला जात आहे. पनवेल ते इंदापूर लांबीतील चौपदरीकरणाचे काम भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणातर्फे जून, २०१८ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित आहे. इंदापूर ते झाराप हया ३५३ कि.मी. लांबीत चौपदरीकरणाचे काम जून, २०१९ पूर्वी पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या ताफ्यात वातानुकूलित बससेवा सुरु करण्याबाबत

**(१२) * ३५६४७ आर्कि.अनंत गाडगीळ : तारांकित प्रश्न क्रमांक २६७७८ ला दिनांक १० मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या** संदर्भात सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या ताफ्यात २००० वातानुकूलित बससेवा सुरु करण्याची घोषणा करण्यात येऊनही सध्या केवळ १३ वातानुकूलित बस दाखल करण्यात आल्या असल्याने प्रवाशांची गैरसोय होत असून परिवहन विभागाचेही आर्थिक नुकसान होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्य परिवहन महामंडळात घोषणा केल्याप्रमाणे २००० वातानुकूलित बससेवा सुरु करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१) राज्य परिवहन महामंडळाच्या ताफ्यामध्ये टप्प्या-टप्प्याने शिवशाही बसेस दाखल होत असून, सद्य:स्थितीत राज्य परिवहन महामंडळास १५३ शिवशाही वातानुकूलित बसेस प्राप्त झालेल्या आहेत.
(२) भाडेतत्वावरील १५०० बसेसपैकी पहिल्या टप्प्यामध्ये ७०० बसेस पुरवठा करण्यासाठी ७ निविदाकारांची नेमणूक करण्यात आली आहे व राज्य परिवहन महामंडळाने स्वमालकीच्या ५०० बसेस बांधून घेण्याबाबत निर्णय घेतलेला आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई-नागपूर बुलेट ट्रेन प्रकल्प कार्यान्वित करण्याबाबत

**(१३) * ३४८५९ श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.आनंदराव पाटील, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, श्री.किरण पावसकर, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई-नागपूर बुलेट ट्रेन प्रकल्प कार्यान्वित करण्याचे शासनाच्या विचाराधीन असून केंद्र शासनास त्याबाबत विनंती करण्यात आलेली आहे व यासंदर्भात आर्थिक व तांत्रिक व्यवहार्यता तपासण्याचे काम सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, केंद्र शासनाकडून यासंदर्भात काही प्रतिसाद मिळाला असल्यास त्याचे स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदर विचाराधीन बुलेट ट्रेन प्रकल्प उभारावयाच्या झाल्यास यासाठी किती खर्च येणे अपेक्षित आहे व सदर खर्च कशाप्रकारे उभारण्याचे प्रस्तावित आहे, या प्रकल्पासंदर्भातील सद्य:स्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१) व (२) होय.

रेल्वे मंत्रालयाने Adiff-Ineco या स्पॅनिश कंपनीची मुंबई-नागपूर जलदगती रेल्वेमार्ग प्रकल्पाचा सुसाध्यता अभ्यास करण्यासाठी नियुक्ती केली आहे.
(३) सदर बाब केंद्र शासनस्तरावर विचाराधीन असून, अदयाप राज्य शासनास केंद्र शासनाकडून याबाबत कोणताही प्रस्ताव प्राप्त नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यात नोटा बंदीमुळे टोल वसुली कंपन्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(१४) * ३६०१३ श्री.बाळाराम पाटील, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात नोटा बंदीमुळे नुकसान झालेल्या टोल वसुली कंपन्यांना नुकसान भरपाई म्हणून रूपये १४४ कोटी ६८ लाख देण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे राज्याच्या तिजोरीवर रूपये ७५०० कोटींचा भार पडणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून शासनावर पडणारा आर्थिक भार कमी करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२) अंशत: खरे आहे.
(३) केंद्र शासनाच्या नोट बंदीच्या निर्णयामुळे सदर कार्यवाही केली असल्याने सदर निधीची मागणी केंद्र शासनास करण्यात आली होती.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य परिवहन महामंडळातील प्रवाश्यांची होणारी घट रोखण्याबाबत

**(१५) * ३४८२७ श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.अनिल भोसले, श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.सुभाष झांबड, श्री.अमरनाथ राजूरकर : तारांकित प्रश्न क्रमांक ३२४६० ला दिनांक ३१ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या** संदर्भात सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य परिवहन महामंडळाचे गत पाच वर्षात सुमारे १७ कोटी ६१ लाख प्रवासी कमी झाल्याची माहिती माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य परिवहन महामंडळाला आर्थिक तोटा रूपये १,८०० कोटी वरुन रूपये २,१०० कोटी पर्यंत गेला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्य परिवहन महामंडळाची आर्थिक स्थिती सुधारण्याबाबत तसेच, राज्य परिवहन महामंडळाचे नुकसान करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१) नाही.

एप्रिल, २०१२ पासून सप्टेंबर, २०१७ पर्यंत (मागील ५ वर्षांत) प्रवासी संख्येत १५.७९ कोटीने घट झालेली आहे.

(२) सन २०१५-१६ अखेर महामंडळास रुपये १८०७.२३ कोटी इतका संचित तोटा होता. आता सन २०१६-१७ च्या अलेखापरिक्षित लेख्यांनुसार महामंडळाचा संचित तोटा रुपये २३१२.७२ कोटी झाला आहे.

(३) राज्य परिवहन महामंडळाची आर्थिक स्थिती सुधारण्याबाबत विभागांचे भारमान, उत्पन्नामध्ये वाढ व खर्चात कपात करण्याच्यादृष्टीने विभागांना सूचना प्रसारित करण्यात आलेल्या असून, उत्पन्नात वाढ करण्यासाठी प्रवासी वाढवा योजना, नैमत्तिक करारावर देण्यात येणाऱ्या बसेसच्या अटीमध्ये बदल हिरकणी सेवेत पुश बॅक आसन सुविधा, नवीन वातानुकूलित शिवनेरी व शिवशाही बसेसची खरेदी, सक्षम मार्ग तपासणी व अवैध वाहतूकीद्वारे उत्पन्न गळती रोखणे, प्रवासी आकर्षित करण्यासाठी समाजातील २४ विविध घटकांना ५० ते १०० टक्केपर्यंत प्रवास भाडयात सवलत, मासिक/त्रैमासिक कार्ड योजनांना व्यापक प्रसिध्दी देऊन प्रवासी व उत्पन्न वाढीसाठी उपाययोजना करण्यात आलेल्या आहे. त्याचबरोबर ई-तिकीटद्वारे आरक्षण सुविधा, स्मार्ट कार्ड सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या असून प्रवाशांच्या सोईकरिता मोबाईल ॲप तयार करण्यात आलेला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## ठाणे व पालघर जिल्हयात परतीच्या पावसामुळे नुकसानग्रस्तांना मदत देण्याबाबत

**(१६) * ३४९८४ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.रविंद्र फाटक, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील, श्री.हरिसिंग राठोड, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे व पालघर जिल्हयातील महत्वाचे उत्पन्न असलेल्या भात पिकांचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान आलेल्या पावसाने नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, डहाणू किनारपट्टीला दिनांक २१ सप्टेंबर, २०१७ रोजी झालेल्या चक्रीवादळामुळे पिकांचे नुकसान झाले असून डहाणू किनारपट्टीवरील सतीपाडा, डहाणू खाडी, चिंचणी परिसर पुरामुळे बाधित झाला असून तर वाणगांव, बावडा, आसनगाव, देदाळे, कालवली येथील बागायतींचे नुकसान झाले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू पिकांच्या नुकसानाचे पंचनामे करून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शेतकरी व स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्तांचे पंचनामे करून नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) पालघर जिल्ह्यात डहाणू किनारपट्टीला दिनांक २१ सप्टेंबर, २०१७ रोजी झालेल्या चक्रीवादळामुळे डहाणू किनारपट्टीवरील बावडा, देदाळे, कोलवली, चिंचणी येथील फळपिकांचे व भाजीपाल्याचे नुकसान झाले असून सतीपाडा, डहाणू खाडी, वाणगांव, आसनगांव येथील बागायतदारांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(३) होय.

(४) दिनांक १६ ऑक्टोबर, २०१७ व दिनांक २७ ऑक्टोबर, २०१७ रोजीच्या शासनपत्रांन्वये, राज्यात माहे जून ते सप्टेंबर मध्ये अतिवष्टीमुळे व माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये परतीच्या पावसामुळे झालेल्या शेती व फळपिकांच्या नुकसानीचे पंचनामे करुन, पिकांच्या नुकसानीबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याबाबतच्या सूचना क्षेत्रिय अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## इसांबे (ता.खालापूर, जि.रायगड) रस्त्यावरील खोकर पुलाची दुरवस्था झाल्याबाबत

**(१७) * ३५५१८ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इसांबे (ता.खालापूर, जि.रायगड) गावानजिक असलेला रस्त्यावरील खोकर पुलाची दुरवस्था झाली असून सदर नादुरूस्त पुलावरून अवजड वाहनांची मोठ्या प्रमाणात वाहतुक होत असल्यामुळे उक्त नादुरूस्त पुल वाहतुकीस धोकादायक झाला असून सदर पुलावर दुर्घटना होण्याची शक्यता निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर नादुरूस्त पुलाचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात येवून पुलाची देखभाल, दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नाशिक जिल्ह्यात परतीच्या पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत

**(१८) * ३५१०४ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नाशिक, निफाड, सिन्नर, इगतपुरी, सटाणा, कळवण, मालेगांव व देवळा (जि.नाशिक) या तालुक्यात दिनांक १ ऑक्टोबर, २०१७ पासून झालेल्या परतीच्या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे द्राक्ष, टोमॅटो, कांदा, भाजीपाला, सोयाबीन, बाजरी, मका, तांदुळ, उडीद, मुग व अन्य पिकांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) प्राथमिक अहवालानुसार नाशिक जिल्ह्यात परतीच्या अवकाळी पावसामुळे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये शेतीपिकांचे व फळपिकांचे सुमारे २५,८०९.२५ हे क्षेत्राचे नुकसान झाले असल्याची बाब निदर्शनास आलेली आहे.
(२) दिनांक २७ ऑक्टोबर, २०१७ रोजीच्या शासनपत्रान्वये ऑक्टोबर, २०१७ मध्ये परतीच्या पावसामुळे झालेल्या शेती व फळपिकांच्या नुकसानीचे पंचनामे करुन, पिकांच्या नुकसानीबाबतचा अहवाल शासनास सादर करण्याबाबतच्या सूचना क्षेत्रिय अधिकाऱ्यांना देण्यात आलेल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्यातील दूध उत्पादक शेतकऱ्यांना हमीभाव देण्याबाबत

**(१९) * ३५६२४ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे :** सन्माननीय **दुग्धविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील दूध उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना विविध दूध उत्पादक संस्थाकडून दूधाला वेगवेगळे दर दिले जातात, त्यामुळे दूध उत्पादक शेतकऱ्यांची दूध उत्पादक संस्थाकडून फसवणूक केली जात आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, दूध उत्पादक शेतकरी व शेतकरी संघटना यांच्याकडून दूधास हमी भाव मिळणेसाठी विविध मोर्चा व आंदोलने याद्वारे शासनाकडे वारंवार मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दूध उत्पादक शेतकऱ्यांच्या दूधास हमीभाव देणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर :** (१) राज्यातील दूध उत्पादन करणाऱ्या शेतकऱ्यांना दूध उत्पादक संस्थांकडून दूधाला वेगवेगळे दर दिले जातात, हे खरे आहे. शासनाने निश्चित केलेले दूध खरेदी दर हे शासन व सहकार क्षेत्राकरिता लागू आहेत.

मात्र, खाजगी दूध क्षेत्राच्या दूध खरेदी व विक्री दरावर शासनाचे नियत्रंण नसल्याने दूध उत्पादक शेतकऱ्यांना खाजगी दूध क्षेत्राकडून प्रचलित बाजारभावाप्रमाणे दर दिला जातो हे खरे आहे.

(२) दूधास हमी भाव मिळावा याकरिता विविधस्तरावर शेतकरी व शेतकरी संघटनांनी केलेली लेखी निवेदने शासनास वारंवार प्राप्त होत असतात. याच संदर्भात सोलापूर जिल्हयातील दूध उत्पादक शेतकऱ्यांनी दिनांक १३/९/२०१७ रोजी तहसिल कचेरी पंढरपूर येथे तेथील जिल्हा सहकारी संघांविरुध्द मोर्चा काढून आंदोलन केले असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे हे खरे आहे.

(३) व (४) दूध व दुग्धजन्य पदार्थांचा समावेश, जीवनावश्यक वस्तु अधिनियम, १९५५ मध्ये अंतर्भूत आहे. सदर अधिनियमातील कलम ३ (२) (क) येथील तरतुदीनुसार जीवनाश्यक पदार्थांसाठी किमान आधारभूत खरेदी दर निश्चित करण्याचे अधिकार केंद्र शासनास आहेत. सदर वस्तुस्थिती लक्षात घेवून राज्य शासनाने यापूर्वीच दिनांक १९ ऑगस्ट, २०१५ च्या पत्रान्वये दूधासाठी किमान आधारभूत किंमत निश्चित करण्यात यावी अशी केंद्र शासनास विनंती केली आहे. याबाबत केंद्र शासनाने अद्यापी राज्य शासनास कळविलेले नाही.

तथापी दूध उत्पादक शेतकऱ्यांचे हित जोपासण्याची आवश्यकता लक्षात घेवून शुगर प्राईज कंट्रोल ॲक्टच्या धर्तीवर दूधाकरीता कायदा करण्याची कार्यवाही शासनस्तरावर विचाराधीन आहे.

-----------------

## मराठवाडा विभागातील राज्य परिवहन महामंडळाच्या बस स्थानकांची दुरवस्था झाल्याबाबत

**(२०) * ३५०११ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयवंतराव जाधव, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मराठवाडा विभागातील राज्य परिवहन महामंडळाच्या बस स्थानकांची अत्यंत दुरवस्था झाली असून माहे सप्टेंबर व ऑक्टोबर महिन्यात झालेल्या पावसामुळे सर्व बस स्थानकांमध्ये पाणी साचल्याने बस स्थानक परिसराची दुरवस्था झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बस स्थानक व परिसरातील मोठे खड्डे आणि रस्त्यांच्या दुरवस्थेमुळे महामंडळाच्या बसेसचे मोठे नुकसान होत असून बस स्थानकामधील गैरसोईमुळे प्रवाश्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्य मार्ग परिवहन महामंडळच्या बस स्थानक आणि परिसरातील रस्ते दुरुस्त करून प्रवाश्यांना मुलभूत सोई सुविधा मिळवून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१) हे अंशत: खरे आहे.

मराठवाड्यातील बीड व परभणी विभागातील काही बसस्थानकांवर पावसाळयात पाणी साचत आहे.

(२) नाही.

(३) मराठवाड्यातील राज्य परिवहन महामंडळाच्या बीड, जालना, औरंगाबाद, लातूर, उस्मानाबाद, नांदेड व परभणी या विभागांमधील बसस्थानकांतील खड्डे खडी व मुरुमाने भरण्यात आलेले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजाच्या स्मारकाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(२१) * ३४८६२ ॲड.निरंजन डावखरे, डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३१५१७ ला दिनांक २४ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या** संदर्भात सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईच्या अरबी समुद्रात उभारावयाच्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या स्मारकाचे जलपूजन मा.पंतप्रधान महोदयांचे शुभहस्ते दिनांक २४ डिसेंबर, २०१६ रोजी करण्यात आले असून सदर स्मारकाचे काम माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये सुरु करण्यात येणार असल्याचे शासनाने नियुक्त केलेल्या शिवछत्रपती स्मारक समितीच्या अध्यक्षांनी माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान जाहीर केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर स्मारकाचे काम अद्याप सुरु न होण्याची कारणे काय, तसेच स्मारकाच्या अंदाजित मूळ खर्च किती होता व आता किती खर्च अपेक्षित आहे, सदर स्मारकाचे खर्चाबाबत निधी उपलब्धतेची तरतूद कशी करण्यात येणार आहे,

(३) असल्यास, मुंबई नजिक अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराज यांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक प्रकल्पासाठी प्राप्त निविदा उघडून तांत्रिक मुल्यांकन पुर्ण करून आर्थिक देकार उघडण्याची कार्यवाही पुर्ण झाली आहे काय व प्रकल्पाचे सविस्तर आराखडे महानगरपालिका/सक्षम प्राधिकरण यांचेकडे मान्यतेकरिता सादर करण्यात आले आहेत काय, प्रकल्पाचे आराखड्यास महानगरपालिका/सक्षम प्राधिकरणाकडून यांचेकडील मान्यता प्राप्त झाली आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) मुंबईच्या अरबी समुद्रात उभारावयाच्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचे जलपूजन मा.पंतप्रधान महोदयांचे शुभहस्ते दिनांक २४ डिसेंबर, २०१६ रोजी करण्यात आले हे खरे आहे.

(२) सदर स्मारक कामाची निविदा आंतरराष्ट्रीय स्तरावर EPC तत्त्वावर मागविण्यात आली होती. त्यानुषंगाने दोन निविदाकार पात्र झाले. त्यानंतर या दोन पात्र निविदाकारांपैकी लघुत्तम बोलीच्या निविदाधारकाच्या देकाराची तपासणी करण्यात येत आहे. देकाराच्या तपासणीनंतर व निविदा मान्यतेनंतर कार्यारंभ आदेशासंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्यात येणार आहे. स्मारकाच्या कामाची निविदा EPC तत्त्वावर मागविण्यात आली असल्याने निविदा देकार अंतिम झाल्यानंतर स्मारकाच्या अंदाजित रक्कम निश्चित होणार आहे व त्याप्रमाणे कामावर खर्च अपेक्षित आहे. स्मारकाच्या कामासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात रुपये १५० कोटी तरतूद करण्यात आली आहे व माहे नोव्हेंबर अखेर रुपये १६.६८ कोटी खर्च झाला आहे. स्मारकाच्या कामासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात येते.

(३) प्रकल्पासाठी निविदा उघडून तांत्रिक मूल्यांकन पूर्ण करुन आर्थिक देकार उघडण्याची कार्यवाही पूर्ण झाली आहे. प्रकल्पाची निविदा अद्याप अंतिम झाली नसल्याने सविस्तर आराखडे अद्याप महानगरपालिका/सक्षम प्राधिकरण यांच्याकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आलेले नाही. निविदा अंतिम झाल्यानंतर स्मारकाचे सविस्तर आराखडे महानगरपालिका/सक्षम प्राधिकरण यांच्याकडे सादर करण्यात येतील.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोपरी (जि.ठाणे) येथील शासकीय वसतिगृहामधील विजयश्री इमारतीची दुरवस्था झाल्याबाबत

**(२२) * ३५६९३ श्री.रविंद्र फाटक :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोपरी (जि.ठाणे) येथील शासकीय वसतिगृहामधील विजयश्री इमारतीचे प्लास्टर पडल्याचे तसेच पावसाळ्यामध्ये पाण्याची गळती होत असल्याने सदर इमारतीची दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर इमारतीची दुरुस्ती करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.सावर्जनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर इमारतीची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची करणे काय आहे ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय, अंशतः खरे आहे.
(२) हे खरे आहे.
(३) बारा बंगला परिसर, कोपरी, ठाणे येथील विविध शासकीय निवासी इमारतींचे वार्षिक देखभाल व दुरूस्तीचे विशेष दुरूस्ती अंतर्गत रुपये १३२.४५ लक्ष इतक्या रकमेचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून सदर निविदा प्रक्रिया हाती घेण्यात येत आहे. निविदा प्रक्रीया पूर्ण होताच विजयश्री इमारतीमधील आवश्यक कामे तातडीने हाती घेऊन पूर्ण करण्याचे नियोजन आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कुजबा (ता.कुही, जि.नागपूर) गावाचे पुनर्वसन करण्याबाबत

**(२३) * ३५४४४ श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुजबा (ता.कुही, जि.नागपूर) गावातील जमीन गोसीखुर्द प्रकल्पाच्या पाण्याखाली जात असल्यामुळे सदर गावाचे पुनर्वसन झाले नसल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्पग्रस्त गावातील शेतकऱ्यांनी पुनर्वसन व त्यांना योग्य तो मोबदला देण्याबाबत जिल्हाधिकारी, नागपूर यांच्याकडे दिनांक २३ जुलै, २०१५ रोजी निवेदन देवूनही कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रकल्पबाधित गावाचे पुनर्वसन करून त्यांना योग्य तो मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) मौजा कुजबा गावठाण गोसीखुर्द प्रकल्पाच्या पुर्णसंचय पातळीमुळे बाधित होत नसल्यामुळे पुनर्वसन करण्याचा प्रश्न उद्भवत नाही. प्रश्नोक्त निवेदनाबाबत कार्यकारी अभियंता, गोसीखुर्द पुनर्वसन विभाग, नागपूर यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मौजा कुजबा गावठाण प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात येत नाही. पुनर्वसन कायदयातील तरतूदीनुसार सदर गाव पुनर्वसनास पात्र होत नाही. त्यामुळे पुनर्वसन करुन मोबदला देण्याचा प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हयातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना मदत देण्याबाबत

**(२४) * ३५०३० श्री.ख्वाजा बेग, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.हेमंत टकले :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्हयात शेतकरी आत्महत्या थांबविण्यासाठी शासनाने बळीराजा चेतन अभियान योजना आणि वसंतराव नाईक शेतकरी स्वावलंबी मिशन योजना अशाप्रकारे जिल्हयात रूपये ३२ कोटी खर्चाची योजना राबविल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त योजनाचा लाभ किती शेतकऱ्यांना कोणकोणत्या स्वरुपात देण्यात आला आहे,
(३) असल्यास, जिल्हयात पांढरकवडा तालुक्यातील करंजी रोड येथील शेतकरी मोहन रसाल चव्हाण, सिंगलदिप येथील राजू रामचंद्र टेकाम व घांटजी येथील शेतकरी शुभम दिलीप देशमुख यांनी कर्जबाजारीपणामुळे व शासनाच्या योजनांचा लाभ न मिळाल्याने आत्महत्या केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने उक्त आत्महत्याग्रस्त कर्जबाजारी शेतकऱ्यांच्या कुटुंबियांना कोणती आर्थिक मदत केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२) बळीराजा चेतना अभियानांतर्गत जिल्ह्यातील ४०७३८ शेतकऱ्यांना पेरणी, अकस्मात आजार व हात उसनवारी करीता मदत देण्यात आली आहे. तसेच कै.वसंतराव नाईक शेतकरी स्वालंबन मिशन अंतर्गत जिल्ह्यातील ४०५२१५ शेतकऱ्यांना राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना व १८४११ शेतकऱ्यांना महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत आरोग्य सेवा पुरविण्यात आली.
(३) व (४) या प्रकरणांपैकी शासन मदतीसाठी पात्र ठरलेल्या राजू रामचंद्र टेकाम यांच्या वारसांना रू.१.०० लक्ष मदत देण्यात आली असून श्री.चव्हाण यांच्या वारसांना मदत देण्याची कार्यवाही सुरू आहे. मात्र शुभम दिलिप देशमुख यांनी शेती विषयक कारणाने आत्महत्या केली नसल्याने सदर प्रकरण अपात्र ठरविण्यात आले आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## माझगाव, मुंबई येथील विक्रीकर भवनाच्या इमारत दुरुस्तीच्या कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(२५) * ३४७७० श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अनिल भोसले :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) माझगाव, मुंबई येथील विक्रीकर भवनाच्या जुनी व नवी इमारत दुरुस्तीची विविध प्रकारची २१ कामे एकाच ठेकेदाराला देऊन या कामात रूपये ९८ लाखांचा गैरव्यवहार झाल्याचे लोकप्रतिनिधी व कंत्राटदार यांनी मा.मुख्यमंत्री यांना माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिलेल्या तक्रारीमुळे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) माझगाव, मुंबई येथील विक्रीकर भवन इमारतीच्या विविध विविक्षीत दुरुस्ती अंतर्गत एकूण २१ कामांबाबत मा.आमदार श्री.प्रशांत बंब यांचा दिनांक १६/३/२०१७ रोजीचा तक्रार अर्ज प्राप्त झाला आहे.
(२) प्रस्तुत तक्रारीच्या अनुषंगाने अधिक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, कोकण भवन, नवी मुंबई यांचेकडून चौकशीची कार्यवाही सुरू आहे. चौकशीनंतर आवश्यकतेनुसार कार्यवाही करण्यात येईल.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील चिरेखाणी बंद करण्याबाबत

**(२६) * ३५८१२ श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील चिरेखाणी पावसाळ्यापूर्वी बंदिस्त करण्यात याव्यात असे आदेश तहसिलदारांनी माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिलेले असतांना चिरेखाणी मालकांनी आपल्या चिरेखाणी बंदिस्त केल्या नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने चिरेखाणी मालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) गौण खनिज उत्खनन परवाना देताना परवानाधारक यांनी गौणखनिज उत्खनन ठिकाणी कंपाऊंड घालणे बंधनकारक असल्याचे परवान्याच्या अटी व शर्तीमध्ये नमुद करण्यात येते. त्यानुसार संगमेश्वर तालुक्यातील सर्व चिरेखाणींना कंपाऊंड घालण्यात आलेले आहे.
(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## "मनोरा" आमदार निवासातील खोल्यांची कामे केल्याचे दाखवून बोगस देयके तयार केल्याबाबत

**(२७) * ३५९४२ ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.सुभाष झांबड, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.अनिल भोसले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मनोरा आमदार निवासातील आमदाराची व्यवस्था घाटकोपर येथे करण्यात येत असतानाच "मनोरा" आमदार निवासातील खोल्यांची कामे केल्याचे दाखवून बोगस देयके तयार करुन रूपये तीन कोटी ७० लाख ५१ हजार रुपयांचा अपहार केल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) व (२) प्राथमिक तपासणीमध्ये मनोरा आमदार निवासामध्ये करण्यात आलेल्या काही कामांमध्ये प्रशासकीय अनियमितता झाल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले आहे. त्यास अनुसरुन याप्रकरणी जबाबदार संबंधित उप अभियंता व शाखा अभियंता यांना शासन सेवेतून निलंबित करण्यात आले आहे. याशिवाय संबंधित कार्यकारी अभियंता यांची अकार्यकारी पदावर बदली करण्यात आली आहे. त्याशिवाय तक्रारतील नमूद बाबींची सविस्तर व निष्पक्षपणे चौकशी करण्याच्या उद्देशाने सार्वजनिक बांधकाम दक्षता पथक मंडळ, मुंबई या राज्यस्तरीय दक्षता पथकास चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यानुसार याबाबत चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुखेड (जि.नांदेड) तालुक्यातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(२८) * ३५५५५ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुखेड (जि.नांदेड) तालुक्यातील चांडोळा गटासह अनेक भागातील रस्त्यांची दुरवस्था झाली असल्यामुळे सदर ठिकाणी वारंवार अपघात होऊन जिवित व वित्तहानी होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्यांची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हयातील कंत्राटदारांच्या मागण्यांबाबत

**(२९) * ३५४३९ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्ह्यातील कंत्राटदारांनी प्रलंबित देयके, जीएसटीबाबतचा संभ्रम, कंत्राटदार नोंदणी, मंडळ कार्यालयाला E-DSR बाबतचे अधिकार, प्रलंबित देयकांवर व्याज, भाव वाढ प्रणाली व इतर मागण्यांबाबत जिल्हाधिकारी, परभणी यांच्या कार्यालयासमोर माहे सप्टेंबर-ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान धरणे आंदोलन केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून जिल्हा कंत्राटदार संघटनेच्यावतीने देण्यात आलेल्या निवेदनाप्रमाणे त्यांचे प्रश्न निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) परभणी जिल्हा कंत्राटदार संघटना, परभणी यांनी प्रश्नांकित मागण्यांच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी, परभणी यांना दिनांक ६/१०/२०१७ रोजी निवेदन दिले आहे.
(२) कंत्राटदारांच्या मागणीच्या अनुषंगाने शासनाने दिनांक १९/९/२०१७, दिनांक २१/९/२०१७ व दिनांक २३/१०/२०१७ च्या परिपत्रकान्वये सविस्तर सूचना निर्गमित केल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्हयातील वरोरा नाका उड्डाणपुलाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(३०) * ३५९३६ प्रा.जोगेन्द्र कवाडे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चंद्रपूर जिल्हयातील वरोरा नाका उड्डाणपुलाचे काम पूर्ण करण्यासाठी दिलेला कालावधी संपल्यानंतरही पुलाचे काम अपूर्णावस्थेत राहिल्यामुळे पुलाचे काम करण्यासाठी देण्यात आलेल्या ठाणे येथील कंत्राटदाराकडून शासनाने रूपये २५ हजारांचा दंड वसूल केला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून उक्त पुलाचे काम करीत असलेल्या कंपनीकडून हे काम काढून अन्य कंपनीला देण्याबाबत तसेच उड्डाण पुलाचे काम पूर्ण करण्यास विलंब लावणाऱ्या कंपनीवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

कंत्राटदारानी स्वीकृत निविदेतील तरतूदीप्रमाणे योग्य वेगाने काम केले नाही. दंडनिय कार्यवाहीपोटी त्यांचेकडून रुपये २५.२५ लक्ष इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

(२) व (३) प्रश्नांकित उडाणपुलाच्या बांधकामापैकी मूल रोड ते नागपूर रोड या भागातील पुलाचे काम पूर्ण झाले आहे. याभागात वाहतुक चालू आहे. उर्वरित वरोरा नाकाचौक ते आंबेडकर कॉलेज या भागातील पुलाचे काम प्रगतीत असून मार्च, २०१८ पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजन आहे. ठेकेदारांनी काम संथगतीने केल्यामुळे त्यांचेविरुध्द दंडनिय कार्यवाही करण्यात आली आहे.

-----------------

## गोंदिया जिल्हयातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(३१) * ३५९१६ श्री.परिणय फुके :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आमगाव, देवरी, गोंदिया, सालेकसा, अर्जूनी व तीरोड (जि.गोंदिया) तालुक्यातील मार्गावर खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाली असल्याने सदर रस्त्यावरून प्रवास करतांना गरोदर महिला, वृध, अपंग नागरीकांना खूप त्रास सहन करावा लागत असून जिवित हानी होण्याचा धोका निर्माण झाला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत स्वयंसेवी संस्थांनी संबंधित अधिकाऱ्यांकडे अनेक वेळा तक्रारी करूनही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून गोंदिया जिल्हयातील रस्त्यांची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राळेगाव-कळंब-वडकी (जि.यवतमाळ) रस्ता रुंदीकरणात तोडण्यात आलेल्या वृक्षांच्या बदल्यात पर्यायी वृक्ष लागवड करण्याबाबत

**(३२) * ३४८७१ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राळेगाव-कळंब-वडकी (जि.यवतमाळ) येथील ५० किलोमीटर परिसरात सिमेंट रोड बांधकाम सुरु असल्याने या रस्ता रुंदीकरणाच्या कामामध्ये येणारी अडीच हजार झाडे तोडण्यात आल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रस्ता रूंदीकरणाच्या कामी तोडण्यात आलेल्या वृक्षांच्या बदल्यात पर्यायी वृक्ष लागवड करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे. सदर रस्त्याचे काम प्रगतीत असून, यासाठी २२४० वृक्ष तोडण्यात येणार आहेत. सदर वृक्ष तोडण्याबाबत वन परिक्षेत्र अधिकारी (प्रा.), मारेगांव यांच्याकडून परवानगी प्राप्त आहे.
(२) करारनामाप्रमाणे तोडण्यात येणाऱ्या/आलेल्या वृक्षांसाठी Forest Conservation Act, मध्ये पाच पट वृक्ष लावण्याची तरतूद आहे. त्याप्रमाणे, वृक्ष लावण्याचे काम करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सफाळे पश्चिम (जि.पालघर) येथील जलसार टेंभीखोडावे जोडरस्त्यावरील पुलाचे काम पूर्ण करण्याबाबत

**(३३) * ३५३२७ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सफाळे पश्चिम (जि.पालघर) येथील जलसार टेंभीखोडावे जोडरस्त्यावर सार्वजनिक बांधकाम विभागाने रूपये १५ लाख खर्च करुन बांधण्यात आलेला पुल अपूर्णावस्थेत असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाचा वापर दारशेतपाडा येथील १०० अंगणवाडी प्राथमिक शाळेतील विद्यार्थी, ५०० शेतकरी व गावकरी दररोज करीत असून पुलाचे बांधकाम अपूर्णावस्थेत असल्यामुळे नागरिक व विद्यार्थी यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर अपूर्णावस्थेत असलेल्या पुलाचे काम पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) नाही.

साकवाचे काम पूर्ण झालेले आहे. तथापि जोडरस्त्याचे काम भूसंपादन न झाल्याने अपूर्ण अवस्थेत आहे. तथापि साकव व जोडरस्त्यावरुन वाहतूक सुरळीत चालू आहे.

(२) हे खरे नाही.

(३) व (४) साकवाच्या जोडरस्त्यासाठी जमीन ताब्यात नसल्याने जोडरस्त्याच्या कामास जमीन मालकांनी विरोध केला आहे. त्यामुळे काम अपूर्ण अवस्थेत आहे.

जमीन मालकांशी विचारविनिमय करुन उपलब्ध जागेत रस्त्याचे काम पूर्ण करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

-----------------

## पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील चंद्रभागा नदीत बुडून मृत पावलेल्या कुटूंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत

**(३४) * ३५४९८ श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्रीमती हुस्नबानू खलिफे : तारांकित प्रश्न क्रमांक ३३८१६ ला दिनांक ३१ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या** संदर्भात सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंढरपूर (जि.सोलापूर) तालुक्यातील चंद्रभागा नदीत वाळूतस्कारांनी खोदलेल्या खड्डयांमुळे चार लहान मुलांचा मृत्यू झाला असून मृत पावलेल्या मुलांच्या कुटूंबियांना मा.मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आर्थिक मदत देण्याची मंत्रिस्तरावरुन घोषणा करण्यात आली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यासंदर्भातील प्रस्तावावर चार महिने होऊनही कोणतीही कार्यवाही झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर प्रस्तावावर निर्णय घेवून मृत चार मुलांच्या कुटूंबियांना आर्थिक मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) पंढरपूर (जि.सोलापूर) येथील चंद्रभागा नदीत पोहण्यास गेलेल्या चार मुलांचा दिनांक १०/६/२०१७ रोजी पाण्यात बुडून मृत्यू झाला होता. सदर दुर्घटनेत मृत पावलेल्या चारही मुलांच्या कुटूंबियांना मा.मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी रुपये १ लक्ष याप्रमाणे एकूण रुपये ४ लक्ष इतकी आर्थिक मदत धनादेशाद्वारे अदा करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अकोला या कार्यालयाच्या जागेमध्ये नवीन इमारतीचे बांधकाम करण्याबाबत

**(३५) * ३५५९५ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अकोला यांचे खडकी व अकोला येथील सर्वे नं ४२ व ३५/२ मधील जागेमध्ये कार्यालयीन इमारत बांधकामाचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता व अनुदान उपलब्ध करून देण्याबाबत शासनस्तरावर काय कार्यवाही करण्यात आली व त्याचे सर्वसाधारण स्वरूप काय आहे,
(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने खडकी व अकोला येथील जागेमध्ये उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाची इमारत बांधण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१) व (२) उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, अकोला या कार्यालयाच्या मौजे खडकी येथील सर्वे नं. ४२ व ३५/२ मधील ४.०२ हेक्टर जागेमध्ये नवीन इमारतीच्या बांधकामाकरिता रुपये ६९४.९६ लक्ष इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास सा.बां.वि. ने प्रशासकीय मान्यता देण्यासाठी सहमती दर्शविलेली आहे. सदर अंदाजपत्रकातील रक्कम ५ कोटी पेक्षा अधिक असल्याने प्रस्ताव, सचिव समितीच्या मान्यतेसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे दिनांक १९/०९/२०१७ रोजी सादर करण्यात आला आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद शहर व जिल्ह्यात वाहतुकीचे नियम तोडणाऱ्या शालेय बस धारकांविरूध्द कारवाई करण्याबाबत

**(३६) * ३५२८१ श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद शहर व जिल्ह्यातील रस्त्यांवरील वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करुन अनेक शालेय बसेस धावत असल्यामुळे विद्यार्थ्यांची शालेय बसमधून होत असलेली वाहतुक सुरक्षित नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने वाहतुकीचे नियम तोडणाऱ्या शालेय बस चालकावर कारवाई करण्याबाबत तसेच विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्यादृष्टीने शालेय बसेसची तपासणी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१) अशा स्वरूपाची वस्तुस्थिती निदर्शनास आलेली नाही.

(२) विद्यार्थ्यांची वाहतुक करणाऱ्या बसेस तसेच इतर सर्व वाहनांची प्रादेशिक परिवहन कार्यालय, औरंगाबाद यांचेकडे उपलब्ध असलेल्या दोन वायुवेग पथकांमार्फत नियमितपणे तपासणी करण्यात येते.

एप्रिल, २०१७ ते ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत ८५० वाहनांची तपासणी करण्यात आली असता त्यामध्ये २७६ वाहने दोषी आढळली. सदर वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात येवून सदर दोषी वाहनांकडून रू. १,७०,०००/- दंड/तडजोड शुल्क वसुल करण्यात आले.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे देवणी बु. (जि.लातूर) येथील बेघर गरजू विस्थापित महिला कुटुंबांना घरासाठी जागेचे प्लॉट त्यांचे नावे करण्याबाबत

**(३७) * ३४९८७ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३१०२३ ला दिनांक ७ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या** संदर्भात सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे देवणी बु. (जि.लातूर) येथील गावठाण विस्तार वाढीसाठी संपादन करण्यात आलेली सर्वे नं. २३८/१ जमिनीतील प्लॉट आर्थिकदृष्ट्या बेघर गरजू लाभार्थ्यांना मिळण्याबाबत समर्थन या संस्थेने माहे मार्च, २०१७ पासून अनेक वेळा शासनाकडे लेखी निवेदनाद्वारे मागणी केली असता दिनांक २९ मार्च, २०१७ रोजी गरजू लाभार्थ्यांना लॉटरी पध्दतीने त्यांचे नावे प्लॉट वितरीत झाले व त्यांना दिनांक ३० मार्च, २०१७ या एका दिवसात भूखंडांची रक्कम त्वरित जमा करण्याचे तहसिलदार, देवणी (जि.लातूर) यांच्याकडून आदेशीत केले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गरजू, दुर्बल घटकातील गरीब लाभार्थ्यांकडे भोगवटा मूल्याची रक्कम जमा करण्याची परिस्थिती नसताना सदरच्या वाटप केलेल्या भूखंडाच्या प्रक्रियेस मा.मंत्री (कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप, पुनर्वसन व माजी सैनिकांचे कल्याण) तथा मा.पालकमंत्री महोदयांनी भूखंडाला स्थगिती देऊन सदरची जागा नगर पंचायत देवणी (जि.लातूर) यांच्याकडे सुपूर्द केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दिनांक २९ मार्च, २०१७ रोजीच्या लॉटरीप्रमाणे आर्थिकदृष्ट्या बेघर गरजू लाभार्थ्यांना विस्थापित महिला कुटुंबाना घरासाठी जागेचे प्लॉट त्यांचे नावे करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही,

दिनांक ३० मार्च, २०१७ या एका दिवसात भूखंडाची रक्कम भरण्या विषयी तहसिलदार, देवणी यांनी आदेशित केले नव्हते.

(२), (३) व (४) उपविभागीय अधिकारी, निलंगा यांनी दिनांक २७/०६/२०१५ रोजी २६ व दिनांक १/१२/२०१६ रोजी ६१ अशा एकूण ८७ पात्र लाभार्थ्यांना मंजूरी दिलेली असून, त्यातील ४५ पात्र लाभार्थ्यांची नावे देखील समाविष्ठ आहे. तहसिलदारांद्वारे प्रत्येक भूखंडाची किंमत रू. ५९५०/- इतकी निश्चित केली आहे. भोगवट्याची रक्कम जमा करण्याविषयी सर्वांना कळविले होते. दिनांक २९/३/१७ ला लॉटरी पध्दतीने भूखंड वाटप निश्चित केले. बहूतांश लाभार्थी हे स्वत:ची घरे बांधण्यास आर्थिकदृष्ट्या सक्षम नाहीत, त्यामुळे त्यांना पंतप्रधान आवास योजना किंवा तत्सम योजनेद्वारे घरे बांधण्याचे विचाराधीन आहे, त्यामुळे मा.मंत्री (कौशल्य विकास व उद्योजकता, कामगार, भूकंप पुनर्वसन व मा.सै.क.) तथा पालकमंत्री, लातूर यांनी दिनांक २९/३/२०१७ च्या पत्रान्वये भूखंड वाटपास तात्पुरती स्थगिती दिली आहे. सदर भूखंड देवणी नगर पंचायतीकडे वर्ग करण्याची कार्यवाही तहसिलदारामार्फत त्वरीत करण्यात येत आहे.

-----------------

## राज्यात खाजगी बस वाहतुकदाराकडून प्रवाशांची होणारी लूट रोखण्याबाबत

**(३८) * ३५७०३ श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.संजय दत्त, श्री.नागोराव गाणार, प्रा.अनिल सोले, श्री.प्रविण दरेकर, श्री.परिणय फुके, श्री.धनंजय मुंडे, श्री.जयवंतराव जाधव, श्री.अमरसिंह पंडित, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सणासुदीच्या कालावधीत व मे महिन्यात विशेष करुन कोकणात गणेशोत्सवासाठी जाणाऱ्या खाजगी प्रवासी वाहतूकदारांकडून बसभाड्यात दुप्पट-तिप्पट वाढ करुन प्रवाशांची आर्थिक लूट केली जात असल्याचे माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खाजगी वाहतूकदारांकडून ऐन सणासुदीत प्रवाशांची होत असलेली लूट थांबविण्याकरीता शासनाने नियंत्रण ठेवावे असे न्यायालयाकडून स्पष्ट करण्यात आले होते, उच्च न्यायालयाने सुमारे एक वर्षापूर्वीच सूचना केल्यानंतरही शासनाकडून त्यावर अद्याप कोणतेही नियंत्रण ठेवण्याकरीता कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने खाजगी बस वाहतूकदारांकडून प्रवाशांची आर्थिक लूट थांबविण्याकरीता तसेच खाजगी बस वाहतूकदारांवर नियंत्रण ठेवण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१) अशा आशयाची बातमी वर्तमानपत्रात प्रसिध्द झाल्याने निदर्शनास आलेली आहे.
(२) व (३) खाजगी कंत्राटी प्रवाशी वाहनांच्याबाबतीत भाडेदर निश्चित करण्याकरीता मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे क्र.१४९/२०११ जनहित याचिका दाखल केली असून सदर याचिकेवर दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने शासनाने भाडेदर निश्चितीकरिता सेंट्रल इन्टीटयुट रोड ट्रान्सपोर्ट (CIRT) पुणे यांची समिती गठित केली. सदर समितीने सादर केलेला अहवाल कार्यवाहीखाली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे खासापूरी (ता.परांडा, जि.उस्मानाबाद) येथील विस्थापितांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(३९) * ३६५४० श्री.तानाजी सावंत :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे खासापूरी, (ता.परांडा, जि.उस्मानाबाद) येथील खासापूरी मध्यम प्रकल्पाच्या कालव्यातील त्रुटीमुळे कालवा फुटल्यामुळे येथील सुमारे १०० कुटूंबीय विस्थापित झाले असून त्यांचे सन १९६२ साली खाजगी जमिनीत

तात्पुरते पुनर्वसन करण्यात आले असता सदर खाजगी जमीन मालकाने न्यायालयाच्या निकालाप्रमाणे पुनर्वसित लोकांना जागा खाली करण्याच्या नोटीसा देण्यात आलेल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन १९६२ सालापासूनचा प्रलंबित प्रश्न निकाली काढण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांसह एक बैठक आयोजित करण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.महसूल मंत्री यांना माहे मार्च, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निवेदन दिलेले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून विस्थापित कुटुंबांचे पुनर्वसन करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय हे अंशत: खरे आहे.

सदर प्रकरणात मा.दिवाणी न्यायालय, कनिष्ठ स्तर, परंडा, ता.परंडा जि.उस्मानाबाद यांनी दिनांक १२/०४/२०१७ रोजी नोटीसा दिलेल्या आहेत.

(२) हे खरे आहे.

(३) खासापुरी मध्यम प्रकल्पाचे काम १९५६ साली पुर्ण झाले. खासापुरी प्रकल्पामध्ये परंडा तालुक्यातील आंदोरा, अंदोरी व राजुरी ही गावे बुडीत क्षेत्रात येत असल्याने या गावांचे पुनर्वसन त्यावेळी करण्यात आलेले आहे. मौ.खासापुरी हे गाव बुडीत क्षेत्रात येत नसल्याने मौ.खासापुरी गावाचे पुनर्वसन करण्यात आलेले नाही.

धरण पुर्ण झाल्यावर १९५७ साली मोठया प्रमाणावर पाऊस पडुन प्रकल्पाचा सांडवा फुटल्यामुळे मौ.खासापुरी गावठाणामध्ये पाणी आले. त्यामुळे गावकऱ्यांनी जुन्या गावठाण पासुन सर्वे नं. ३९ मधील १५ एकर क्षेत्रात वसाहत केली. सदर जमीन खाजगी मालकीची होती. सदर व्यवहार हा खाजगी मालक व गावकरी यांच्यामधील खाजगी खरेदी व्यवहार केल्यामुळे सदरच्या विस्थापित कुटुंबाचे पुनर्वसन करण्याचा प्रश्नच उध्दभवत नाही. त्यामुळे या जमिनीची भूसंपादन प्रक्रीया करता येणार नाही. सध्या स.नं. ३९ ब मध्ये वस्ती झालेली असल्याने सध्या तरी अतिरिक्त जमीन संपादनाची आवश्यकता नाही. ग्रामपंचायत खासापुरी यांनी ०५/११/२०१६ रोजी ग्रामसभा घेऊन ठराव क्र.२ द्वारे सदर जमीन शासनाकडुन संपादित करण्याची विनंती

केली होती. त्या अनुषंगाने तहसिलदार परंडा यांनी त्यांचे पत्र दिनांक १९/११/२०१६ अन्वये गट विकास अधिकारी परंडा यांना सविस्तर उत्तर दिले असुन ग्रामसभेचा ठराव नियमबाहय जाहीर करण्याबाबत कळविलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील रस्त्यांचे रूंदीकरण आणि मजबुतीकरणाची कामे झाली नसल्याबाबत

**(४०) * ३५४९४ श्री.धनंजय मुंडे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत राज्यातील दहा हजार कि.मी. रस्त्यांचे रूंदीकरण आणि मजबुतीकरण करण्याच्या महत्वाकांक्षी प्रकल्पांतर्गत एका कि.मी. चे ही काम झाले नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पांतर्गत एन्युईटी पध्दतीने निविदा काढुन कामे करण्यासाठी रुपये तीन हजार कोटींची अर्थसंकल्पात तरतुद करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर कामांस विलंब झाल्याबाबत दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय.

हायब्रीड ॲन्युईटी कार्यक्रम अंतर्गतच्या कामांच्या निविदा निश्चितीची कार्यवाही प्रगतीत आहे.

(२) होय.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मत्स्य महाविद्यालय कोकण कृषी विद्यापीठाशी संलग्न ठेवण्याबाबत

**(४१) * ३५८७३ श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **मत्स्यविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे व सिंधुदुर्ग जिल्हयात एक-एक मत्स्य महाविद्यालय स्थापन करुन राज्यातील ५ महाविद्यालयांवर नियंत्रण ठेवणारे मत्स्य विद्यापीठ रत्नागिरी जिल्हयातील शिरगाव येथे स्थापन करण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यातून महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ मत्स्य शाखेचे वर्गीकरण करण्याचा प्रस्ताव आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शिरगावचे मत्स्य महाविद्यालय नागपूरस्थित महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठाकडे वर्ग करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर महाविद्यालय नागपूरस्थित महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठाकडे वर्ग करण्याबाबत विरोध होत असल्याने सदर महाविद्यालय कोकण कृषी विदयापिठाशी व संलग्न ठेवण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर :** (१) व (२) महाराष्ट्र मत्स्यविज्ञान व सागरी विज्ञान विद्यापीठ, रत्नागिरी येथे स्थापन करण्याबाबत तसेच सिंधुदुर्ग येथे सागरी विज्ञान महाविद्यालय स्थापन करणे, इंदापूर, पुणे येथे मत्स्यविज्ञान महाविद्यालय स्थापन करणे व महाराष्ट्र पशु व मत्स्यविज्ञान विद्यापीठ नागपूर यांच्या अधिनस्त असलेले नागपूर व उदगीर व डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अधिनस्त रत्नागिरी येथील मत्स्यविज्ञान महाविद्यालय नियोजित मत्स्यविज्ञान विद्यापीठास संलग्न करण्यात यावे अशी डॉ.भालचंद्र मुणगेकर यांच्या अध्यक्षतेखालील अभ्यासगटाने सादर केलेल्या अहवालामध्ये शिफारस केली आहे.

(३) हे खरे नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्गाचे सहापदरीकरणाचे काम प्रलंबित असल्याबाबत

**(४२) * ३५२४७ श्री.अनिल भोसले : तारांकित प्रश्न क्रमांक ३०४७२ ला दिनांक २४ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या** संदर्भात सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्गाचे सहापदरीकरणाचे काम रिलायन्स इन्फ्रा या कंपनीस सुमारे १० वर्षापूर्वी देण्यात आलेले असूनही सदर रस्त्याचे काम पूर्ण न झाल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने पुणे-सातारा राष्ट्रीय महामार्गाचे काम पूर्ण करण्याबाबत तसेच, सदर महामार्गाचे काम अपूर्ण ठेवणाऱ्या रिलायन्स इन्फ्रा या ठेकेदार कंपनीवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत पुणे सातारा या १४० कि.मी. राष्ट्रीय महामार्गाच्या सहापदरीकरणाचा प्रकल्प खाजगीकरणाच्या माध्यमातून जानेवारी, २०१० मध्ये हाती घेण्यात आलेला असून सुमारे १२३ कि.मी. (८६.५०%) लांबीमध्ये सहापदरीकरणाचे बांधकाम पूर्ण करण्यात आलेले आहे.

(२) सदर प्रकल्पास भूसंपादन, वन विभागाची परवानगी, सेवा वाहिन्यांचे स्थलांतर, वृक्ष छाटणीची परवानगी, धार्मिक स्थळे, कामांच्या वावातील बदल तसेच स्थानिकांच्या अतिरीक्त भुयारी मार्गासाठी मागण्या अशा विविध बाबींमुळे विलंब झालेला असून प्रकल्प शक्य तितक्या लवकर पूर्ण करण्याचे नियोजन असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, पुणे यांनी कळविले आहे.

सदरील प्रकल्प केंद्र शासनाच्या अखत्यारीत असल्याने राज्य शासनामार्फत कारवाईचा प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कृषी विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत

**(४३) * ३५१५२ ॲड.जयदेव गायकवाड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या कृषी विभागांतर्गत ७ हजार ४१९ पदे रिक्त असल्याने शेतकरी व शेतीसंबंधी कामे वेळेवर पूर्ण होत नसल्याने अनेक अडचणींना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत कर्मचारी संघटनेने तसेच लोकप्रतिनिधींनी रिक्त पदे भरण्याबाबत शासनाकडे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान मागणी केलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कृषी विभागातील रिक्त पदे भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.पांडुरंग फुंडकर :** (१) हे अंशत: खरे आहे.

विभागामध्ये माहे सप्टेबर २०१७ अखेर एकुण २७५०२ मंजूर असून पदांपैकी १९१३५ पदे भरलेली असून ८३६७ पदे रिक्त आहेत.

(२) होय, हे खरे आहे.

(३) महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब (कनिष्ठ) या संवर्गात दिनांक १०/११/२०१७ रोजी ५० उमेदवारांना नियुक्ती देण्यात आलेली आहे. तसेच ७९ पदांचे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगास सादर करण्यात आलेले असून लोकसेवा आयोगाकडून दिनांक १२/०४/२०१७ रोजी जाहिरात विज्ञापित करण्यात आलेली आहे.

कृषि सहाय्यक या संवर्गातील ७३० कृषि सेवकांची निवड यादी सर्व विभागीय कृषि सहसंचालक यांना पाठविण्यात आलेली असून त्याबाबत प्रचलित नियमानुसार पुढील कार्यवाही करण्याच्या सूचना देलेल्या आहेत. कृषि सहाय्यकांची रिक्त असलेली उर्वरित ११२५ सर्व पदे भरण्यासाठी विशेष बाब म्हणून शासन मान्यता दिलेली आहे.

वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक २५/०५/२०१७ नुसार आकृतिबंध अंतिम मंजूर होईपर्यत नवीन पदनिर्मिती तसेच पदभरती करता येणार नाही यास्तव विभागातील पदांचा आढावा घेवून कृषि विभागाचा सुधारित आकृतिबंध मान्यतेस्तव वित्त विभागास सादर करण्यात आलेला आहे. प्रस्तावित आकृतिबंधाच्या अनुषंगाने कृषि आयुक्तालयातील तसेच अधिनस्त क्षेत्रिय कार्यालयातील पदे निश्चितीनंतर त्या संवर्गाची पदे नियुक्ती प्राधिकाऱ्यांचे स्तरावर प्रचलित नियमानुसार भरण्याची कार्यवाही अनुसरण्यात येणार आहे.

तसेच शासन पत्र दिनांक २/११/२०१७ अन्वये पदोन्नतीचे आरक्षणासंदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिकेच्या अनुषंगाने सर्व स्तरावरील पदोन्नती प्रक्रिया दिनांक १३/११/२०१७ पर्यंत स्थगित ठेवण्यात यावी, असे निर्देश देण्यात आलेले आहेत, त्यावर पुढील आदेश शासनाकडून प्राप्त होतील त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य परिवहन कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याबाबत

**(४४) * ३५८८९ डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.बाळाराम पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.आनंदराव पाटील, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, आर्कि.अनंत गाडगीळ, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, प्रा.जोगेन्द्र कवाडे, श्री.हरिसिंग राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.सुभाष झांबड, श्री.गोपिकिशन बाजोरीया, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.जयवंतराव जाधव, श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अनिल भोसले, प्रा.अनिल सोले, श्री.नागोराव गाणार, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य मार्ग परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीसाठी सन २०१२ मध्ये केलेला करार दिनांक ३१ मार्च, २०१६ रोजी संपला असून शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे महामंडळातील कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी, वेतनवाढ, वेतन सवलती लागू करण्याची मागणी दिनांक २९ सप्टेंबर, २०१७ रोजी उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्य परिवहन महामंडळातील वाहक व चालकांना इतर कर्मचाऱ्यांप्रमाणे ७ वा वेतन आयोग लागू करण्यात यावा व वेतनवाढ करण्यात यावी या मागणीसाठी राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसच्या वाहक व चालकांनी दिनांक १८ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास संप पुकारला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी नागपूर विभागाच्या लोकप्रतिनिधींनी दिनांक ११ ऑक्टोबर, २०१७ रोजी पत्र पाठवून राज्य परिवहन महामंडळातील कर्मचाऱ्यांना न्याय देण्याची विनंती केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना ७ वा वेतन आयोग लागू करुन वेतनात वाढ करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१), (२) व (३) होय.

कर्मचाऱ्यांनी दिनांक १७/१०/२०१७ ते दिनांक २०/१०/२०१७ या ४ दिवसाच्या कालावधीत संप केला होता.

(४) मान्यताप्राप्त एसटी कामगार संघटनेने दिनांक १७/१०/२०१७ ते २०/१०/२०१७ पर्यंत केलेल्या ४ दिवसांच्या संपाबाबत मा.उच्च न्यायालयात श्री.जयंत साटम व श्री.विनोद वाघमारे यांनी अनुक्रमे २९८८/२०१७ व २९७९१/२०१७ जनहित याचिका दाखल केली होती. मा.उच्च न्यायालयाने महामंडळातील कर्मचाऱ्यांनी केलेला संप मागे घेण्याचे व वेतनवाढीबाबत उच्चस्तरीय समिती गठीत करण्याचे आदेश दिले होते.

मा.उच्च न्यायालयाच्या आदेशांच्या अंमलबजावणीसाठी गृह विभागाच्या, शासन निर्णय दिनांक २३/१०/२०१७ अन्वये उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद कृषी विभागाच्या कार्यालयात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(४५) * ३५४१८ श्री.सतिश चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.विक्रम काळे, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औरंगाबाद कृषी विभागाच्या कार्यालयात कृषी विभागातील व बँकेतील वरीष्ठ अधिकारी यांच्या संगनमताने आत्मा संस्थेचे प्रकल्प संचालक कृषी अधिक्षक यांच्या बनावट सह्या करुन रूपये २ कोटींचा गैरव्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.पांडुरंग फुंडकर :** (१) व (२) अंशत: खरे आहे. प्रकल्प संचालक (आत्मा), औरंगाबाद व जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय, औरंगाबाद येथे सुमारे रुपये ५.४३ कोटी इतक्या रकमेचा गैरव्यवहार झाल्याचे प्राथमिक चौकशी अहवालावरुन स्पष्ट झाले आहे. त्याअनुषंगाने श्री.सुनिल गहेनाजी जाधव या वरिष्ठ लिपीकाविरुध्द उस्मानपुरा पोलीस स्टेशन, औरंगाबाद येथे गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना दिनांक २९/७/२०१७ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे. तसेच तत्कालीन आयुक्त (कृषि) यांनी संबंधित कार्यरत अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीसा बजावल्या असून खुलासा मागविण्यात आला आहे, त्याबाबत अधिक चौकशी करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पेठ-नाशिक-येवला-औरंगाबाद या चौपदरी रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(४६) * ३४८७९ श्री.जयवंतराव जाधव : तारांकित प्रश्न क्रमांक ३१८६६ ला दिनांक ३१ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या** संदर्भात सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पेठ-नाशिक-येवला-औरंगाबाद प्र.रा.मा.क्र.२ या चौपदरी रस्ता किमी १७९/०० ते २२८/४०० या दरम्यान खड्डे पडून रस्त्याची दुरवस्था झाली असल्याने सदर रस्त्याची दुरूस्ती करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ३१ मे, २०१७ रोजी वा त्यासुमारास अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, नाशिक यांचेकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रस्त्याची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) प्रश्नाधीन रस्त्याच्या क्षतिग्रस्त लांबीत दुरुस्तीचे काम प्रगतीपथावर आहे. काम निधीच्या उपलब्धततेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे. रस्त्यावरुन वाहतूक सुरळीतपणे चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## प्रधानमंत्री पीक वीमा योजनेंतर्गत पुनर्रचित हवामान आधारित पीक विमा योजनेची माहिती शेतकऱ्यांना देण्याबाबत

**(४७) * ३५८९८ आर्कि.अनंत गाडगीळ : तारांकित प्रश्न क्रमांक २९८४२ ला दिनांक १७ मार्च, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या** संदर्भात सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यास प्रधानमंत्री पीक वीमा योजनेंतर्गत पुनर्रचित हवामान आधारित पीक विमा योजना २०१७-१८ लागू करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ही योजना फळपिकांनाही लागू आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर योजनेची माहिती शेतकऱ्यांना व्हावी यासाठी जागृती मोहिम हाती घेण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.पांडुरंग फुंडकर :** (१) होय.
(२) होय.
(३) शासन व विमा कंपनीच्या स्तरावरुन रेडियो, कृषि विषयक मासिके, वृत्तपत्र अशा माध्यमांतुन प्रचार व प्रसिध्दी देण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## यवतेश्वर (जि.सातारा) घाट रस्त्यांची दुरूस्ती करण्याबाबत

**(४८) * ३६३२६ श्री.जगन्नाथ शिंदे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतेश्वर घाटातील (जि.सातारा) रस्ता दिनांक २ ऑक्टोबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास खचल्याने कास पठाराकडे जाणारी वाहतूक पूर्ण बंद झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर घाट रस्त्याची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) घाटातील संरक्षक भिंत क्षतिग्रस्त झाल्याने काही भागात रस्ता खचला होता.
(२) रस्त्याच्या खचलेल्या भागातील वाहतुकीवर नियंत्रण ठेवून फक्त एक पदरी वाहतूक सुरु ठेवण्यात आली आहे. संरक्षक भिंतीचे बांधकाम करुन रस्ता दुरुस्त करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पाली-खोपोली (जि.रायगड) राष्ट्रीय महामार्गावरील जांभूळपाडा नदीवरील पुलाची दुरवस्था झाल्याबाबत

**(४९) * ३५६४३ श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाली-खोपोली (जि.रायगड) राष्ट्रीय महामार्गावरील जांभूळपाडा नदीवरील पुल हा वाहतूक करिता अत्यंत महत्वपूर्ण असून या पुलावरून रात्रदिवस वाहनांची मोठ्या प्रमाणावर वर्दळ असून हा पुल सद्यःस्थितीत जूना व नादुरूस्त झालेला असल्याने पुल केव्हाही कोसळून मोठी जीवितहानी होण्याचा धोका निर्माण झाला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पुलाचे मुख्य खांब खचलेले असून पूर्णतः मोडकळीस आल्याची परिस्थिती निर्माण झालेली असून पुलाचे संरक्षण कठडेही तुटलेले असल्याने वाहने नदीत कोसळण्याची भिती निर्माण झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर पुलाचे स्ट्रक्चरल ऑडीट करून पुलाची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) वाकण-पाली-खोपोली हा रस्ता दिनांक ३ जानेवारी, २०१७ रोजी घोषित झालेल्या राष्ट्रीय महामार्ग ५४८अ चा भाग असून त्यावर जांभूळपाडा नदीवर जूना बुडीत पुल अस्तित्वात आहे ही वस्तुस्थिती आहे. पुलाचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आले असून त्यानुसार सा.बां. विभागामार्फत पुलाच्या तात्पुरत्या दुरुस्तीचे व पुलावरील नादुरुस्त कठड्यांची दुरुस्तीचे काम दिनांक ३०/१०/२०१७ रोजी पूर्ण केले असल्याने पुल वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे. सदरील रस्त्यावर ७४८९ पॅसेंजर कार प्रति दिन (PCU) इतकी वाहतुक वर्दळ आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे निमगांव (ता.मालेगांव, जि.नाशिक) येथे अपर तहसिल कार्यालय स्थापन करण्याबाबत

**(५०) * ३५१०३ डॉ.अपूर्व हिरे : तारांकित प्रश्न क्रमांक ३३६६४ ला दिनांक २४ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या** संदर्भात सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तालुका विभाजनाचे निकष निश्चित करण्याकामी धोरण अंतिम करण्याची कार्यवाही शासनस्तरावरून पूर्ण होत असतांना नविन तालुका निर्मिती व मौजे निमगांव (ता.मालेगांव, जि.नाशिक) येथे अप्पर तहसिल कार्यालय स्थापन करण्याचे प्रस्तावित करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुका विभाजनाचे निकष निश्चित करणेकामी धोरण अंतिम करण्याची कार्यवाही पुर्ण झाली आहे काय, त्यानुषंगाने पुढे कोणता निर्णय घेण्यात आला व काय कार्यवाही करण्यात आली,

(३) असल्यास, मालेगांव तालुका ग्रामीण व शहरी भागाची वाढलेली प्रचंड लोकसंख्या, त्याचा मालेगांव तहसिल कार्यालयावर प्रशासकीयदृष्टया येणारा मोठा ताण व निमगांव परिसरातील गांवाची असलेली मोठी संख्या याबाबी विचारात घेता निमगांव येथे नविन अप्पर तहसिल कार्यालय सुरु करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नविन तालुका निर्मिती व मौजे निमगांव येथे अप्पर तहसिल कार्यालय स्थापन करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) राज्यातील महानगरपालिका क्षेत्रात स्वतंत्र अप्पर तहसिलदार कार्यालय स्थापन करण्याची बाब विभागाच्या विचाराधीन असून सदर क्षेत्रात अप्पर तहसिलदार कार्यालय स्थापन करण्यासाठी आवश्यक असणारी पदे नवीन निर्मिती न करता विभागाचा सुधारित आकृतीबंध निश्चित झाल्यानंतर काही पदे अतिरिक्त ठरल्यास ती अप्पर तहसिलदार कार्यालयासाठी समायोजित करुन उपलब्ध करुन घेणे

शक्य होईल काय याबाबतची तपासणी करण्यात येत आहे. सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर मालेगांव महानगरपालिका क्षेत्रासह राज्यातील अन्य महापालिका क्षेत्रात अप्पर तहसिलदार कार्यालय स्थापन करण्याबाबत उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

तालुका विभाजनाच्या अनुषंगाने निकष निश्चित करण्याबाबत विभागीय आयुक्त, कोकण यांच्या अध्यक्षतेखाली गठीत करण्यात आलेल्या समितीचा अहवाल शासनास प्राप्त झालेला आहे. प्राप्त अहवालातील शिफारशीच्या अनुषंगाने सर्व विभागीय आयुक्तांकडून मागविण्यात आलेले अभिप्राय प्राप्त झाले असून तालुका विभाजनाचे निकष निश्चित करण्याबाबत मंत्रिमंडळाच्या मान्यतेने धोरण ठरविण्याची कार्यवाही सुरु आहे. सदर धोरण निश्चित झाल्यानंतर प्रकरणपरत्वे नवीन तालुका निर्मितीबाबत उचित निर्णय घेण्याचे योजिले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे चळे (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील पशुवैद्यकीय दवाखान्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(५१) * ३५६२२ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.विक्रम काळे, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे चळे (ता.पंढरपूर, जि.सोलापूर) येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात जनावरांच्या उपचारासाठी पशुवैद्यकीय अधिकारी तसचे औषधे नसल्यामुळे उपचाराअभावी जनावरे दगावत असून शेतकऱ्यांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पशुवैद्यकीय दवाखान्याची सोयी-सुवेधी अभावी दुरवस्था झालेली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर ठिकाणी कायमस्वरूपी निवासी पशुवैद्यकीय अधिकारी उपलब्ध करून देण्याबाबत तसेच, औषधांचा पुरवठा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर :** (१) नाही.

(२) व (३) पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी १ मौजेचळे, ता.पंढरपूर, जि.सोलापूर येथे विविध योजनेंतर्गत औषध पुरवठा व लस पुरवठा मुबलक प्रमाणात केलेला आहे.

या ठिकाणी बदलीने पदस्थापना करण्यात आलेले पशुधन विकास अधिकारी अद्याप हजर झाले नाहीत.

परंतु, सदर दवाखान्याच्या दैनंदिन कामकाजासाठी तालुक्यातील पशुधन विकास अधिकारी यांच्याकडे अतिरिक्त कार्यभार सोपवला आहे. तसेच पशुधन पर्यवेक्षकाची पुर्ण वेळ नियुक्ती केली आहे. त्याप्रमाणे दवाखान्याचे दैनंदिन कामकाज सुरु असून, तालुक्यात कोणत्याही साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव नाही. तसेच, उपचारा अभावी जनावरे दगावल्याची कोणतीही घटना घडलेली नाही व शेतकऱ्यांची गैरसोय झालेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बीड जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत

**(५२) * ३४९९६ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयवंतराव जाधव, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक २४०९५ ला दिनांक १५ डिसेंबर, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या** संदर्भात सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बीड जिल्ह्यात माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये अतिवृष्टी व पूर परिस्थितीमुळे बाधित झालेल्या नुकसानीबाबतचा अहवाल जिल्हाधिकारी, बीड यांनी दिनांक १० नोव्हेंबर, २०१६ रोजीच्या पत्रानुसार विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना सादर केला असून उक्त अहवालात पिकनिहाय नुकसानीसह बाधित शेतकरी संख्या आणि नुकसानग्रस्तांना द्यावयाच्या रकमेसह माहिती शासनास सादर केली असता अद्याप नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळालेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने माहे ऑक्टोंबर, २०१६ मधील बाधित शेतकऱ्यांना नुकसान भरपाईची मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) सदर बाब निदर्शनास आलेली आहे.

(२) शासन निर्णय, दिनांक ०९ जानेवारी, २०१७ अन्वये, राज्यात माहे जून ते ऑक्टोबर २०१६ च्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पिक विमा योजनेअंतर्गत मंडळनिहाय भरपाईची जी रक्कम देय असेल त्या रकमेच्या ५० टक्के रक्कम प्रधानमंत्री पिक विमा योजनेत सहभागी न झालेल्या शेतकऱ्यांना मदत म्हणून देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी दिनांक २१/११/२०१७ रोजीच्या पत्रान्वये, निधी मागणीबाबतचा औरंगाबाद विभागाचा एकत्रित प्रस्ताव सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने माहे जून ते ऑक्टोबर, २०१६ च्या अतिवृष्टीमुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मदत देण्यासंबंधीची कार्यवाही करण्याबाबतची बाब प्रगतीपथावर आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## नागपूर-मुंबई समृध्दी महामार्ग व अन्य विकास प्रकल्प निधीअभावी प्रलंबित असल्याबाबत

**(५३) * ३४८१५ ॲड.निरंजन डावखरे, श्री.जनार्दन चांदूरकर, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.चंद्रकांत रघुवंशी, श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.सुभाष झांबड, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.रामहरी रुपनवर, श्री.आनंदराव पाटील :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने नागपूर-मुंबई दरम्यान ७०० कि.मी. लांबीचा समृध्दी महामार्ग बांधण्याचा निर्णय घेतला असून त्यासाठी अंदाजे रूपये ४३ हजार कोटी खर्च अपेक्षित असून या प्रकल्पासाठी शासनाकडे निधी उपलब्ध नसल्यामुळे शासनाने माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये राज्यातील बँक अधिकाऱ्यांची बैठक घेऊन बँकांना आर्थिक सहाय्य करण्याबाबत सादर केलेल्या प्रस्तावास बँकांनी प्रतिसाद न दिल्यामुळे मा.मुख्यमंत्री महोदयांनी माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये दक्षिण कोरिया शासनाकडे निधीची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर महामार्गासाठी जमिनी देण्यास शेतकऱ्यांचा विरोध असताना तसेच महामार्ग बांधणीसाठी शासनाकडे निधीच नसताना व प्रकल्पाची तातडी देखील नसताना परदेशी अर्थसहाय्य घेऊन सदरचा महामार्ग बांधण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर महामार्गासाठी दक्षिण कोरीया शासनाकडून शासनास किती अर्थसहाय्य मिळणार आहे, अर्थसहाय्य मिळण्यासाठी अटी/ शर्ती व निकष काय आहेत तसेच त्याबाबतची सद्य:स्थिती काय आहे,

(४) असल्यास, समृध्दी महामार्ग बांधण्याकडे शासनाचा असलेला कल लक्षात घेता, निधीची असलेली टंचाई यामुळे वांद्रे-वर्सोवा सागरी सेतू, मुंबई-पुणे द्रुतगती महार्गावरील खंडाळा घाटातील मिसिंग लेनचे बांधकाम, भिवंडी-कल्याण शिळफाटा रस्त्याचे सहापदरीकरण, ठाणे खाडीवरील तिसरा पुल, ठाणे-घोडबंदर उन्नत मार्ग असे सुमारे रुपये १४ हजार कोटींचे प्रकल्प प्रलंबित असल्याचे दिनांक १७ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.एकनाथ शिंदे** : (१), (२) व (३) महाराष्ट्र समृध्दी महामार्ग बांधण्यासाठी दिनांक ०८/०३/२०१७ व दिनांक १३/०९/२०१७ रोजी बँका व वित्तीय संस्था समवेत बैठकी घेण्यात आल्या असून यामध्ये प्रकल्प उभारणीच्या अनुषंगाने चर्चा करण्यात येत आहे. तसेच दक्षिण कोरीया शासनासमवेत द्विपक्षीय करारनामा करण्यात आला असून, निधी उपलब्धीच्या अनुषंगाने चर्चा करण्यात येत आहे.

(४) हे खरे नाही. वांद्रे-वर्सोवा सागरी सेतू, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील खंडाळा घाटातील मिसिंग लिंकचे बांधकाम, भिवंडी-कल्याण शिळफाटा रस्त्याचे सहापदरीकरण, ठाणे खाडीवरील तिसरा पुल, ठाणे-घोडबंदर उन्नत मार्ग या प्रकल्पास मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समितीने दिनांक १३/०६/२०१७ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता प्रदान केली आहे. महामंडळामार्फत निधी उभारण्याचे काम प्रगतीपथावर असून राष्ट्रीयकृत बँका व हुडकोमार्फत सुमारे रुपये ३५१८ कोटी निधी मंजुरीचे पत्र महामंडळास प्राप्त झाले आहे.

(५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## कोंढाळी (ता.काटोल, जि.नागपूर) येथील जनावरे उपचाराअभावी दगावल्याबाबत

**(५४) * ३५४७० श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोंढाळी (ता.काटोल, जि.नागपूर) येथे एकटांग्या रोगाची शेतकऱ्यांच्या जनावरांना लागण झालेली असतांना सदर ठिकाणी जनावरांच्या उपचाराकरीता पशुवैद्यकीय अधिकारी रूग्णालयात येत नसल्यामुळे उपचाराअभावी शेकडो जनावरे दगावल्याची घटना दिनांक ३१ जुलै, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रुग्णालयात जनावरांच्या उपचारासाठी उपस्थित नसणाऱ्या पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, उक्त आजारावर आळा घालण्यासाठी शासनाने कोणती उपाययोजना केली तसेच बाधीत शेतकऱ्यांना मोबदला देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर :** (१) कोंढाळी, ता.काटोल, जि.नागपूर येथे जनावरांमध्ये एकटांग्या रोगाची लागण झालेली नाही. तथापि, पशुवैद्यकीय दवाखान्यात पशुवैद्यकीय अधिकारी कृत्रिम रेतन, लसीकरण इ. तसेच जनावरांवरील उपचार करित आहेत.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ जिल्हयात रस्ते व इमारतीची कामे प्रलंबित असल्याबाबत

**(५५) * ३५०२४ श्री.ख्वाजा बेग, श्री.हेमंत टकले, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्ह्यात रस्ते व इमारतीची कामे मागील सहा महिन्यापासून बंद असून नविन कामाचे कोणतेही प्रस्ताव सार्वजनिक बांधकाम विभागाने तयार केलेले नाहीत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पूर्ण झालेल्या रस्ते व इमारतींच्या कामांची ठेकेदाराची शेकडो कोटीची देयके प्रलंबित असल्याने कंत्राटदारानी आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रस्तुत प्रकरणी कंत्राटदाराची प्रलंबित देयके काही प्रमाणात अदा करण्यात आली आहेत. संबंधित कंत्राटदारांकडून आंदोलन मागे घेण्यात आले आहे.

-----------------

## मुंबई-गोवा महामार्गावरील प्रकल्पग्रस्तांची नावे सातबाऱ्यावरुन कमी केल्याबाबत

**(५६) * ३६२४८ श्री.नरेंद्र पाटील, श्री.धनंजय मुंडे, श्री.किरण पावसकर, श्री.जयवंतराव जाधव, ॲड.निरंजन डावखरे, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंद ठाकूर, ॲड.राहुल नार्वेकर, श्री.अनिल भोसले, श्रीमती विद्या चव्हाण :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-गोवा महामार्गवरील प्रकल्पग्रस्तांची नावे सातबाऱ्यावरुन कमी केली असून कोट्यवधी रुपयांचा मोबदला हवा असल्यास प्रांताधिकारी व दलाल टक्केवारीनुसार कमिशन मागत असल्याची तक्रार माणगांव (जि.रायगड) येथील शेतकऱ्यांनी मा.मुख्यमंत्री यांच्याकडे केली असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करून प्रकल्पग्रस्तांना न्याय देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) अशा प्रकारच्या तक्रारी मा.मंत्री महसूल, संबंधित सचिव तसेच सक्षम प्राधिकारी यांच्याकडे केलेल्या असून त्याच्या प्रती मा.मुख्यमंत्री महोदयांना अग्रेषित केलेल्या आहेत.

(२) व (३) शासनास प्राप्त तक्रारी दिनांक ३०/१०/२०१७ च्या पत्रान्वये जिल्हाधिकारी रायगड यांच्याकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात आलेल्या आहेत.

त्यासंदर्भात संबंधित सक्षम प्राधिकारी यांचेकडून संबंधितांना सुनावणी देऊन, गुणवत्तेनुसार व शासन नियमानुसार कार्यवाही करुन प्रकल्पग्रस्तांना न्याय देण्याची कार्यवाही करण्यात आली/ येत आहे.

-----------------

## महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या उभारणीकरिता मुंबई उपनगरातील बोरिवली, गोराई येथे जमीन देण्याबाबत

**(५७) * ३५८२७ श्री.प्रविण दरेकर, श्री.गिरीशचंद्र व्यास, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.नागोराव गाणार :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या उभारणीकरिता मुंबई उपनगरातील बोरिवली जवळच्या गोराई येथे जमीन देण्यासंदर्भात दिरंगाई करीत असल्याबाबत मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी सचिव, महसूल विभाग, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर तसेच सर्व्हेक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांना दिनांक २२ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास न्यायालयात हजर राहण्याचे आदेश दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर जमीन महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या उभारणीकरीता देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) मौजे गोराई, ता.बोरीवली येथील न.भू.क्र. ११५/अ या सुमारे १२० एकर शासकीय भूखंडापैकी शासन ज्ञापन, महसूल व वन विभाग दिनांक १०/०६/२०१६ अन्वये ६० एकर जमीन महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापिठासाठी मंजूर करण्यात आलेली आहे. परंतु, सदर जमिनीच्या मोजणीसाठी तेथील स्थानिक नागरिकांचा तीव्र विरोध असल्यामुळे जमिनीची मोजणी होवू शकली नाही. त्यामुळे सदर जमिनीच्या चतुःसिमा निश्चित करण्यात आलेल्या नाहीत.

दरम्यानच्या कालावधीत त्याच न.भू.क्र. ११५/अ शासकीय जमिनीपैकी ४० एकर जमीन रिमोट रिसिव्हींग स्टेशन उभारण्यासाठी “भारतीय विमान पत्तन प्राधिकरणास” देण्याच्या अनुषंगाने जमीन हस्तांतरणासाठी राज्य शासन, भारतीय विमान पत्तन प्राधिकरण व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्यामध्ये त्रिपक्षीय करार करण्यात आला आहे.

मा.उच्च न्यायालयात विधी विद्यापिठास सत्वर निर्वेध शासकिय जमीन मिळण्याबाबत जनहित याचिका क्र. ०७/२०१७ दाखल करण्यात आली आहे. सदर जनहित याचिकेच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने पोलीस बंदोबस्तात मोजणी करण्याचे आदेश पारित केले. त्यानुसार दिनांक १२/०७/२०१७ रोजी सदरहू जमिनीच्या मोजणी कार्यवाही पूर्ण करण्यात आली आहे.

महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ व भारतीय विमान पत्तन प्राधिकरण यांना प्रदान करण्यात येणारी जमीन ही एकाच नगर भूमापन क्रमांकामधील असल्याने या दोन्ही बाबींसाठीच्या प्रदान जमिनींची स्थळ निश्चिती व सिमा निश्चिती करणे आवश्यक आहे. या संदर्भात वस्तुस्थिती स्पष्ट करण्याकरीता उक्त नमूद जनहित याचिकेमध्ये मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दिनांक २६/०९/२०१७ रोजी प्रधान सचिव (महसूल), जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर व जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख, मुंबई उपनगर हे न्यायालयीन निर्देशानुसार मा.मुंबई उच्च न्यायालयात उपस्थित होते. मा.उच्च न्यायालयाने दिनांक २६/०९/२०१७ रोजी दिलेल्या निर्देशाच्या अनुषंगाने प्रधान सचिव (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०३/१०/२०१७ रोजी संबंधितांची बैठक घेण्यात आली होती. सदर बैठकीत विधी विद्यापीठास प्रदान करण्यात येणाऱ्या जागेच्या स्थळनिश्चितीकरिता विविध पर्याय विद्यापीठाच्या प्रतिनिधीस उपलब्ध करून देण्यात आले.

तद्नंतर याबाबत मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमुर्तीच्या अध्यक्षते खालील महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, मुंबई यांच्या पायाभूत विकास समितीची दिनांक १०/१०/२०१७ रोजी बैठक झाली. सदर बैठकीत सुचित केल्याप्रमाणे दिनांक १७/१०/२०१७ रोजी विद्यापिठाचे प्रतिनिधी, मुख्य वास्तु विशारद यांचे प्रतिनिधी व भारतीय विमान पत्तन प्राधिकरणाचे प्रतिनिधी यांनी सदरहू शासकीय जमिनीची स्थळ पाहणी केलेली आहे.

न.भू.क्र. ११५/अ मधील सुयोग्य ६० एकर जमीन सिमांकित करून महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या ताब्यात देण्याच्या दृष्टीने प्रयत्न चालू आहेत.

-----------------

## माळीण (ता.आंबेगाव, जि.पुणे) गावाची भुस्खलन सदृष्यस्थिती निर्माण झाल्याबाबत

**(५८) * ३५९४६ ॲड.राहुल नार्वेकर, श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले : तारांकित प्रश्न क्रमांक ३३९४३ ला दिनांक ७ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या** संदर्भात सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माळीण (ता.आंबेगाव, जि.पुणे) गावाचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये सर्व सुविधांनी पुनर्वसन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुनर्वसन करण्यात आलेल्या माळीण गावाचे माहे जून, २०१७ मध्ये पडलेल्या पहिल्याच पावसात भरावात टाकलेली माती वाहून जाऊन रस्ते खचल्याने नुकसान झालेल्या कामास निविदा शर्तीनुसार दोषदायित्व निवारण कालावधीची अट लागू असल्याने, त्यानुसार ठेकेदाराच्या खर्चाने ठेकेदाराकडून अंशत: खचलेल्या ठिकाणी भराव पूर्ववत करण्याचे काम पूर्ण झाले आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय. हे खरे आहे.

(२) पावसाने भरावाची माती खचून खचलेले रस्ते व भराव पुर्ववत करण्याचे काम प्रगतीत आहे. सद्य:स्थितीत भराव सुरक्षित करण्याची कामे पुर्ण करण्यात आली असून रस्त्याचे मजबुतीकरणाचे काम पुर्ण करण्यात आले आहे व डांबरीकरणाचे काम प्रगतीत आहे.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पवना (ता.हिमायतनगर, जि.नांदेड) परिसरातील खनिजाचे अवैध उत्खनन रोखण्याबाबत

**(५९) * ३५५८१ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पवना (ता.हिमायतनगर, जि.नांदेड) परिसरातील माळरानात गौण खनिज तस्कारांनी वन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने खोदकाम करुन अवैधरित्या मुरुम काढण्यास सुरुवात केल्याचे माहे सप्टेबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, यामुळे माळरानावरील जंगलाचे अस्तित्व धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैध गौण खनिज उत्खनन रोखण्याबाबत तसेच संबंधित दोषींवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) पवना (ता.हिमायतनगर, जि.नांदेड) परिसरातील माळरानात गट क्र. १७१ मध्ये अवैधरित्यामुरुम उत्खनन झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये निदर्शनास आले आहे. तथापि, सदरचे उत्खनन हे वन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या संगनमताने झाले असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२) नाही.

(३) सदर परिसरातून गौण खनिजाच्या अवैध उत्खननास प्रतिबंध करण्यासाठी तलाठी व मंडळ अधिकारी यांचे पथक नियुक्त करण्यात आले आहे. त्यांच्यामार्फत दिनांक ०१/०४/२०१७ पासून आतापर्यंत ११ अवैध उत्खनन/ वाहतूकीच्या प्रकरणांमध्ये रुपये १.७० लक्ष इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हयातील बोगस बियाणे विक्रेत्यांवर कारवाई करण्याबाबत

**(६०) * ३५४३६ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील २६८ शेतकऱ्यांना बोगस बियाणे देऊन फसवणुक झाल्याबाबतची चौकशी करुन कारवाई करण्याबाबत जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, जिल्हा परिषद, परभणी यांना अहवाल सादर करण्याचे आदेश कृषी सभापती, जिल्हा परिषद, परभणी यांनी माहे जुलै, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांची फसवणुक करणाऱ्या बियाणे उत्पादक कंपन्या व विक्रेते यांच्या कारभाराची चौकशी करून अहवाल सादर करण्यात आला आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अशा दोषी कंपन्या व विक्रेते यांच्याविरूध्द कारवाई करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.पांडुरंग फुंडकर :** (१) होय.

(२) व (३) परभणी जिल्हयातून कापूस, सोयाबीन, मका, मिरची, काकडी, कोबी या पिकांच्या बियाणांच्याबाबतीत तक्रारी प्राप्त झालेल्या होत्या.

या संदर्भात गुणनियंत्रण विभागाने एकूण ३८८ नमूने तपासणी करीता काढले असून त्यापैकी ३७२ नमूने प्रमाणित असून १६ नमूने अप्रमाणित आढळून आलेले आहेत. १६ अप्रमाणित नमुन्यांपैकी १२ अप्रमाणित नमुन्यांवर कोर्ट केसेस दाखल करण्यात आलेल्या आहेत.

कापूस बियाणांच्या बाबतीत महाराष्ट्र कापूस बी-बियाणे कायद्यातील तरतुदीनुसार बियाणे उत्पादक कंपन्यांकडून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवून देण्याबाबत कार्यवाही चालू आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राळेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यात बळीराजा चेतना अभियानाच्या निधीचा अपहार झाल्याबाबत

**(६१) * ३४८७३ श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राळेगाव (जि.यवतमाळ) तालुक्यात बळीराजा चेतना अभियानाच्या निधीचा कृषी विभागाकडून गैरवापर करण्यात आल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राळेगाव तालुक्यात पाच ठिकाणी कृषी विभागाकडून शेतकरी मार्गदर्शन शिबिराकरिता प्राप्त रूपये एक लाख पंचवीस हजार निधीचा अपहार झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) मंडळ कृषी अधिकारी यांनी शेतकरी मार्गदर्शन शिबिरासाठी माहे एप्रिल, २०१६ मध्ये बँकेतून निधी काढला व माहे ऑगस्ट व सप्टेंबर, २०१६ मध्ये शिबिराचे आयोजन केले.

(२) नाही.

मंडळ कृषी अधिकारी यांनी ४ महिने निधी स्वत:जवळ बाळगल्याने वित्तीय अनियमितता झाल्याचे दिसून येते.

(३) संबंधितांवर नियमानुसार शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्याबाबत जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांना सूचना दिल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## विक्रमगड (जि.पालघर) येथील सार्वजनिक बांधकाम उपविभागांतर्गत गैरव्यवहार झाल्याबाबत

**(६२) * ३५३४१ श्री.आनंद ठाकूर, श्री.सुनिल तटकरे, श्री.हेमंत टकले, श्री.रविंद्र फाटक : तारांकित प्रश्न क्रमांक ३११४९ ला दिनांक ७ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या** संदर्भात सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड (जि.पालघर) तालुक्यातील सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत कामामध्ये होत असलेला विलंब व दुर्लक्ष, अपूर्ण कामे तसेच निकृष्ट दर्जाचे वापरण्यात आलेले साहित्य यामुळे सर्व कामे निकृष्ट दर्जाची झालेली असून याबाबत झालेल्या गैरव्यवहाराची चौकशी करण्याचे आदेश अधिक्षक अभियंता, दक्षता व गुणनियंत्रण मंडळ, नवी मुंबई यांच्याकडून देण्यात आले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने निकृष्ट दर्जाची कामे करून गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित दोषी अधिकारी/कर्मचाऱ्यांवर कोणती दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) चौकशी प्रगतीत आहे. चौकशी अहवाल प्राप्त झाल्यावर त्यातील निष्कर्षानुसार उचित कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## अक्कलकोट (जि.सोलापूर) तालुक्यातील नायब तहसिलदाराचे पद भरण्याबाबत

**(६३) * ३५५१३ श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.हरिसिंग राठोड :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अक्कलकोट (जि.सोलापूर) तालुक्यातील महसूल कार्यालयात प्रशिक्षणार्थी तहसिलदाराची नियुक्ती, वरिष्ठांचे दुर्लक्ष यामुळे येथील १०० हून अधिक प्रकरणे प्रलंबित असल्याचे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महसूल नायब तहसिलदारचे पद रिक्त आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाच्या योजनांची परिणामकारक अंमलबजावणी करण्यासाठी नायब तहसिलदारचे रिक्त पद भरण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) अक्कलकोट तालुक्यात ऑगस्ट, २०१६ ते ऑगस्ट, २०१७ या कालावधीत प्रशिक्षणाचा भाग म्हणून तहसिलदार या पदावर परिविक्षाधीन अधिकाऱ्यांच्या नियुक्तीमुळे कामकाजाच्या निर्गतवर विपरीत परिणाम झाल्याचे निदर्शनास आलेले नाही. तथापि ऑक्टोबर, २०१७ अखेर अक्कलकोट तहसील कार्यालयाच्या विशेष नोंदवहीत १०० हून अधिक प्रकरणे प्रलंबित असल्याचे निदर्शनास आले आहे. ही प्रकरणे न्यायीक/अर्धन्यायीक स्वरुपाची असल्यामुळे प्रकरणपरत्वे मुदतीत प्रकरणे निकाली काढण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

(२), (३) व (४) महसूल नायब तहसिलदार हे पद दिनांक २७/५/२०१७ पासून रिक्त असून या पदाचा अतिरिक्त कार्यभार अन्य अधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आल्याने कामात व्यत्यय निर्माण झालेला नाही. सदर रिक्त पद भरण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश विभागीय आयुक्तांना देण्यात आलेले आहेत.

-----------------

## अकोट व तेल्हारा (जि.अकोला) तालुक्यातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(६४) * ३५६०५ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोट व तेल्हारा (जि.अकोला) या दोन तालुक्यांना जोडणारे सर्वच रस्ते नादुरूस्त असून विशेषत: दर्यापूर, अंजनगाव, हिवरखेड, अकोला या मार्गावर खड्डे पडले असून पावसाळयात या मार्गाची दुरवस्था झाल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अकोट-तेल्हारा-अकोट-अंजनगाव, अकोट-दर्यापूर, अकोट-हरिसाल, अकोट-शेगाव, अकोट-अकोला या महत्वपूर्ण वर्दळीच्या मार्गासह अनेक मार्गाचा समावेश होत असून केवळ देखभाल व दुरूस्तीअभावी सदर रस्त्यांची दुरवस्था झालेली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने रस्त्याच्या कामांकरीता निधी उपलब्ध करून रस्त्यांची देखभाल, दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) व (२) नाही.

प्रश्नांकित रस्त्याच्या लांबीपैकी काही लांबीत रस्ता क्षतिग्रस्त झाला आहे. रस्त्याच्या डांबरी पृष्टभागावर पडलेले खड्डे डांबर मिश्रित खडीने भरण्याचे काम प्रगतीत आहे. रस्त्यावरून वाहतूक सुरळीत चालू आहे.

(३) व (४) रस्त्यांच्या क्षतिग्रस्त लांबीत मजबूतीकरण, डांबरीकरण व सुधारणा करण्याची ६ कामे योजनेंतर्गत व १ काम हायब्रिड ॲन्युईटी अंतर्गत मंजूर आहे. या कामाची निविदा निश्चितीची कार्यवाही प्रगतीत आहे. ठेकेदारी निश्चित करून निधिच्या उपलब्धतेनुसार कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## रामनगर (हनुमाननगर) ते पिशोर (ता.कन्नड, जि.औरंगाबाद) रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत

**(६५) * ३५२८९ श्री.सुभाष झांबड :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रामनगर (हनुमाननगर) ते पिशोर (ता.कन्नड, जि.औरंगाबाद) या ३ कि.मी. रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे सदर रस्त्यावर वारंवार अपघात होत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्याची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

प्रश्नाधीन रस्त्याच्या नादुरूस्तीमुळे अपघात झाला असल्याचे पोलीस अहवालावरून दिसून येत नाही.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

तथापि, रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावरील खड्डे भरण्याचे काम सुरू असून रस्ता वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आला आहे.

-----------------

## यवतमाळ जिल्हयातील शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(६६) * ३५०८९ श्रीमती विद्या चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.हेमंत टकले, श्री.नरेंद्र पाटील :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयात माहे मार्च, २०१७ मध्ये झालेल्या गारपीटीमुळे नऊ तालुक्यांतील चार हजार सहाशे बावीस शेतकऱ्यांच्या ३,५९५ हेक्टरवरील नुकसानीचा प्रस्ताव आयुक्त कार्यालयाकडे प्रलंबित राहिल्यामुळे सदर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत देण्याच्यादृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) व (२) यवतमाळ जिल्ह्यात माहे मार्च, २०१७ मध्ये झालेल्या गारपीटीमुळे ३५९५.२५ हेक्टरवरील शेती/फळपिकांचे नुकसान झाले असल्याची बाब निदर्शनास आलेली आहे.

शासन निर्णय, दिनांक ०६ मे २०१७ अन्वये, चंद्रपूर जिल्ह्यासह राज्यात माहे मार्च २०१७ या कालावधीत अवेळी पाऊस व गारपीट यामुळे बाधित झालेल्या शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत मंडळनिहाय भरपाईची जी रक्कम देय असेल त्या रकमेच्या ५० टक्के रक्कम प्रधानमंत्री पिक विमा योजनेत सहभागी न झालेल्या शेतकऱ्यांना देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आलेला आहे.

परंतु, सन २०१६ साठी रब्बी पिकांचा पिक विमा घोषित न झाल्यामुळे उपरोक्त शासन निर्णयाच्या अनुषंगाने विभागीय आयुक्त, अमरावती यांच्याकडून निधी मागणीबाबतचा विभागाचा एकत्रित प्रस्ताव प्राप्त झाला नसून, सन २०१६ साठी रब्बी पिकांचा पिक विमा घोषित झाल्यानंतर शासन निर्णय, दिनांक ०६ मे, २०१७ अन्वये बाधित झालेल्या शेतकऱ्यांना मदत देण्यासंबंधीची कार्यवाही करण्याबाबतची बाब प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मंत्रालय, मुंबई येथे रंगीत पेव्हर ब्लॉक बसविण्याचे कामात गैरव्यवहार झाल्याबाबत

**(६७) * ३५५०२ श्री.धनंजय मुंडे, श्री.सुभाष झांबड, श्री.जगन्नाथ शिंदे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबईतील मंत्रालयाच्या आवारात स्वातंत्र्य दिनाच्या निमित्याने रंगीत पेव्हर ब्लॉक बसविण्याचे काम न करताच कंत्राटदाराला सुमारे २४ लाख

रूपयांची देयके अदा करण्यात आली असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मंत्रालयाच्या आवारात सिमेंट काँक्रिटीकरण केल्याचे दाखवत सार्वजनिक बांधकाम विभागाने २३ लाखाहून अधिक निधीचा अपहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर कामांबाबत चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सार्वजनिक बांधकाम विभागातील संबंधित दोषी अधिकारी व कंत्राटदारावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) याबाबत तक्रारी प्राप्त झाल्या असून, सदर तक्रारींची तातडीने दखल घेण्यात आली आहे. तक्रारीत नमूद मुद्यांच्या अनुषंगाने अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम दक्षता पथक मंडळ, मुंबई यांना सखोल चौकशी करुन सविस्तर अहवाल सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुषंगाने याबाबत चौकशी सुरु आहे.

-----------------

## मुद्रांक शुल्कात केलेल्या वाढीसंदर्भातील निर्णय रद्द करण्याबाबत

**(६८) * ३४९७३ ॲड.जयदेव गायकवाड : तारांकित प्रश्न क्रमांक ३०९३० ला दिनांक २४ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या** संदर्भात सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बांधकाम क्षेत्रात मागील वर्षापासून घर खरेदीला मंदी असतांना राज्यभरातील नगरपालिका आणि नगरपरिषदांच्या क्षेत्रातील मुद्रांक शुल्कामध्ये दिनांक १२ सप्टेंबर, २०१७ रोजीपासून वाढ करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतल्यामुळे ग्रामीण भागात मुद्रांक व सेवाकर एकाचवेळी वाढविल्यामुळे ग्राहकांना घर घेणे महाग होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने मुद्रांक शुल्कात कपात करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) व (२) दिनांक १ जुलै, २०१७ पासून वस्तू व सेवा कर प्रणालीचा अवलंब करण्यात आला असून "सेवा कर" निरसीत करण्यात आला आहे. त्यामुळे दिनांक १२ सप्टेंबर, २०१७ पासून सेवाकरात कोणतीही वृद्धी करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. तथापि, महाराष्ट्र राज्य हे कल्याणकारी राज्य म्हणून नागरिकांसाठी विविध विकास योजना राबविण्यासाठी नेहमीच अग्रेसर राहिले आहे. भारताच्या संविधानातील राज्य धोरणाच्या निदेशक तत्वांनुसार समाजाचे व्यापक हित सुनिश्चित करण्यासाठी, शासनाला नागरिकांसाठी विविध विकास योजना, प्रकल्प व कार्यक्रमांची अंमलबजावणी करावी लागते. त्यासाठी, लागणारा निधी उभारण्यासाठी राज्याच्या महसूली उत्पन्नामध्ये वाढ करण्याच्यादृष्टीने शासनाने महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या अनुसूची-१ च्या अनुच्छेद २५ व ३४ मध्ये सुधारणा करुन दिनांक ०७ सप्टेंबर, २०१७ पासून मुद्रांक शुल्कामध्ये काही प्रमाणात वाढ करण्याचा निर्णय जाणीव पूर्वक घेतला आहे. घरांच्या किंमतीवर मुद्रांक शुल्काची आकारणी ही अल्प दराने असल्यामुळे मुद्रांक शुल्काच्या दरातील उक्त वाढीमुळे घरांच्या खरेदीवरील एकूण खर्चात फारशी वाढ संभवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नॅशनल हार्टिकल्चर बोर्डाकडून मिळणारे हरितगृह अनुदान निधी राज्याला मिळणार नसल्याबाबत

**(६९) * ३५८५३ डॉ.सुधीर तांबे, श्री.विक्रम काळे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दत्तात्रय सावंत, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील, श्री.शरद रणपिसे, श्री.संजय दत्त, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राष्ट्रीय बागवानी बोर्डाकडून (नॅशनल हार्टिकल्चर बोर्डाकडून)(एनएचबी) मिळणारे हरितगृह अनुदान निधी अभावी राज्याला मिळणार नसल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, गुजरात, मध्यप्रदेश व विदर्भ वगळता इतर राज्यातील शेतकऱ्यांनी हरितगृहाचे प्रस्ताव पाठवू नये असे आदेश राष्ट्रीय बागवानी बोर्ड (एनएचबी) ने दिले आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अनुदानाअभावी राज्यातील इतर भागातील शेतकऱ्यांचे कामे ठप्प होणार असल्याने हरितगृहाचे राज्यातील सर्व मंजूर प्रस्तावाला अनुदान मिळण्यासाठी केंद्र शासनाकडे कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.पांडुरंग फुंडकर :** (१) व (२) राष्ट्रीय बागवानी बोर्ड (नॅशनल हॉर्टिकल्चर बोर्ड) केंद्र शासनाच्या अखत्यारीतील आहे. सदर बोर्डाकडून करण्यात येणारी कार्यवाही केंद्र शासनाशी संबंधित आहे.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## येवला (जि.नाशिक) औद्योगिक क्षेत्रातील तसेच मालेगांव-नांदगाव-येवला रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(७०) * ३४८८२ श्री.जयवंतराव जाधव :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) येवला (जि.नाशिक) औद्योगिक क्षेत्रातील रस्ता (बी.आय.नं. ११९) तसेच मालेगांव-नांदगाव-येवला (बी.आय.नं. १२०) या दोन रस्त्यांची दुरूस्ती करण्यासाठी हायब्रीड ॲन्युइटी अंतर्गत दिनांक ३० नोव्हेंबर, २०१६ रोजी प्रशासकीय मान्यता देवूनही या रस्त्यांची कामे सुरु झालेली नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्याची दुरूस्ती करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

हायब्रीड ॲन्युईटी कार्यक्रम अंतर्गत विषयांकित दोन्ही कामाच्या निविदा प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

(२) व (३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे येथील नागरिकांना वाहन परवाना प्रमाणपत्र व इतर कागदपत्रे पोस्टाद्वारे वितरीत करण्याबाबत

**(७१) * ३५९०० आर्कि.अनंत गाडगीळ :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाच्या प्रादेशिक परिवहन कार्यालय आणि पोस्ट कार्यालय यांच्या समन्वयाने शहरातील नागरिकांना पोस्ट खात्यामार्फत वाहन परवाना नोंदणी प्रमाणपत्र तसेच इतर कागदपत्रांचे वितरण करण्यात येते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुणे येथे मागील १५ महिन्यांच्या कालावधीत जनरल पोस्ट कार्यालयामधील पोस्टमनच्या बेजबाबदारपणामुळे तब्बल १२ हजार ९०६ वाहन नोंदणी प्रमाणपत्रे आणि ६ हजार ५५९ लायसन्स वितरीत करण्यात आली नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने बेजबाबदार पोस्टमनवर कारवाई करून नागरिकांना वाहन परवाना प्रमाणपत्र व इतर कागदपत्रे पोस्टाद्वारे वितरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१) होय, हे खरे आहे.

(२) व (३) माहे जुलै, २०१६ ते सप्टेंबर, २०१७ या कालावधीत प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांच्याव्दारे २,९४,०७५ वाहन चालक अनुज्ञप्ती व ४,३५,००२ वाहन नोंदणी प्रमाणपत्रे वितरणाकरीता पोस्ट विभागाकडे पाठविली असता पोस्ट विभागाकडून ५,६५५ वाहन चालक अनुज्ञप्ती व १२,०३३ वाहन नोंदणी प्रमाणपत्रे अपुऱ्या व चुकीच्या पत्याअभावी वितरित न झाल्याने परत आलेल्या आहेत. त्यापैकी ३३४२ वाहन चालक अनुज्ञप्ती व ६८९९ वाहन नोंदणी प्रमाणपत्रे हस्तबटवड्याने अर्जदारांना प्रत्यक्ष वितरित करण्यात आलेल्या आहेत.

वरील विषयाच्या अनुषंगाने पोस्ट खात्याच्या संबंधितांसोबत बैठक घेण्यात येवून त्यावर उपाययोजना करण्याबाबत संबंधितांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रायगड जिल्ह्यातील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसस्थानकांची दुरवस्था झाल्याबाबत

**(७२) * ३५६८० श्री.जयंत पाटील :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्ह्यातील महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या रेवदंडा (ता.अलिबाग), पेण (ता.पेण), नागोठणे (ता.रोहा), पनवेल (ता.पनवेल), पाली (ता.सुधागड) या बसस्थानकांसह रायगड जिल्ह्यातील अनेक बसस्थानकात खड्डे पडून दुरवस्था झालेली असून बसस्थानकात मुलभूत सुविधेअभावी प्रवाशांची गैरसोय होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर बस स्थानकाची दुरूस्ती करण्याबाबत तसेच प्रवाशांना सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१) व (२) रेवदंडा, पेण, नागोठाणे, पाली (ता.सुधागड) व पनवेल येथील बसस्थानकाच्या वाहनतळावर पडलेले खड्डे मुरुम टाकून तात्पुरत्या स्वरुपात बुजविण्यात आले असून, इतर आवश्यक सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत. तसेच, सर्व सुविधांनी युक्त असे अद्ययावत बसस्थानक/आगार बांधणेसाठी मंजुरी घेण्यात आली असून, त्याबाबतची निविदा प्रक्रिया सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मालेगांव (जि.नाशिक) येथे पश्चिम भागासाठी नविन बसस्थानक निर्माण करणेबाबत

**(७३) * ३६६८१ डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.नाशिक) शहर व तालुका भागाचा वाढता विस्तार, शहराची हद्दवाढ होवून अनेक गावांचे महानगर हद्दीत झालेले समावेश, वाढलेली लोकसंख्या यामुळे वर्दळीच्या व अडचणीच्या अपघात प्रवण ठिकाणी असलेल्या विद्यमान मध्यवर्ती बसस्थानकाची सुविधा अपुरी पडत असल्यामुळे मालेगांव येथे नविन बसस्थानक उभारण्याबाबत मालेगांव येथील स्थानिक सामाजिक, सेवाभावी संस्था, सामाजिक कार्यकर्ते यांचेकडून नविन बसस्थानक निर्माण करणेबाबत सातत्याने मागणी केली जात आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून शहराचे विद्यमान मध्यवर्ती बसस्थानकावरून फेऱ्यांची असलेली मोठी संख्या तसेच कुसूंबा रोड, पिवळा पंप भागात अत्यंत दाटीवाटी व प्रचंड रहदारीच्या ठिकाणी असलेले मध्यवर्ती बसस्थानक अत्यंत अडचणीचे व सुरक्षित वाहतुकीचेदृष्टीने धोकेदायक ठरले असून बसस्थानक परिसरात वारंवार होणारे अपघात व त्यात ओढवणारे मृत्यू, त्यामुळे उद्‌भवणारी कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती, शहराची संवेदनशिलता इ. बाबी विचारात घेता पश्चिम भागात नविन बसस्थानक निर्माण करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१) होय.

(२) राज्य परिवहन महामंडळाद्‌वारे मालेगांव शहराच्या पश्चिमेस नवीन बसस्थानकासाठी स.न. २३७ मधील ८ एकर जागेचा प्रस्ताव अप्पर जिल्हाधिकारी, मालेगांव यांना दिलेला होता. तथापि, दिनांक २६/११/२००८ रोजी अप्पर जिल्हाधिकारी, मालेगांव यांचे बैठकीत स.नं. २३७ वर जिल्हा न्यायालयाचे आरक्षण असल्याचे स्पष्ट झाले. जिल्हा न्यायालयास सदर

स.नं. २३७ मध्ये इमारत बांधावयाची नसल्याने, सदर जागेवर जरी न्यायालयाचे आरक्षण असले तरी, राज्य परिवहन महामंडळाला देणेबाबत दिनांक २२/०५/२००९ रोजी विनंती केली असता, सदर जागा न्यायालयाने राज्य परिवहन महामंडळास देण्यास नकार दिलेला आहे. त्यामुळे नवीन बसस्थानक व आगाराचा प्रश्न प्रलंबित असल्याने अन्य पर्यायी जागा शोधण्याचे आदेश महामंडळास देण्यात आलेले आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## शालेय अभ्यासक्रमामध्ये कृषी विषय समाविष्ट करणेबाबत

**(७४) * ३५६२९ श्री.दत्तात्रय सावंत, श्री.विक्रम काळे, श्री.श्रीकांत देशपांडे, श्री.बाळाराम पाटील, डॉ.सुधीर तांबे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात शालेय अभ्यासक्रमात कृषी विषय समाविष्ट करणेसाठी शासनाकडून राज्यातील चार कृषी विद्यापीठाच्या कुलगुरू यांच्या उपस्थितीत बैठकीचे आयोजन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यात प्रामुख्याने कृषी हा मुख्य व्यवसाय असल्याने कृषी क्षेत्रात आवश्यक असणाऱ्या कुशल मनुष्यबळ कमी पडत आहे तसेच युवा शेतकऱ्यांना शेतीमधील नवीन तंत्रज्ञाची माहित नसल्याने शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठेचे ज्ञान तत्पर अवगत होत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विद्यार्थ्यांना शालेय जीवनात शेतीबाबत ज्ञान होण्याच्या दृष्टीने कृषी विषय शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट करणेबाबत मागणी केली जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शालेय अभ्यासक्रमात कृषी विषय समाविष्ट करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.पांडुरंग फुंडकर :** (१) होय.

(२) नाही.

(३) होय.

(४) सद्य:स्थितीत असा कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील मानधनावरील कर्मचाऱ्यांना एकछत्र योजना सुरु करणेबाबत

**(७५) * ३५०१२ श्री.अमरसिंह पंडित, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण, श्री.जयवंतराव जाधव, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ३२६३९ ला दिनांक २४ जुलै, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या** संदर्भात सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मानधनावरील कर्मचाऱ्यांना कोतवालप्रमाणे सामाजिक सुरक्षा देण्यासाठी एकछत्र योजना सुरु करणेबाबत दिनांक १८ मार्च, २०१७ रोजी शासनाने मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर समितीच्या अहवालातील निष्कर्ष काय आहेत,

(३) असल्यास, माहे ऑक्टोबर मध्ये अंगणवाडी कार्यकर्ती व मदतनीस यांनी सुमारे २८ दिवस त्यांच्या विविध मागण्यासाठी संप करून तीव्र निदर्शने केली होती, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने राज्यातील पोलीस पाटील, आशा वर्कर्स आणि अंगणवाडी सेविका सह इतर मानधनावर काम करणाऱ्या कर्मचारी यांना सामाजिक सुरक्षा मिळावी म्हणून त्यांना शासकीय सेवेत कायम करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय.

राज्यातील कोतवाल तसेच "पोलीस पाटील", "आशा वर्कर्स" व "अंगणवाडी सेविका" या व अशा मानधनावर असलेल्या अन्य कर्मचाऱ्यांचा एकत्रित विचार करुन त्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी "एकछत्र योजना" तयार करण्याकामी, दिनांक १८ मार्च, २०१७ च्या शासन निर्णयान्वये अपर मुख्य सचिव (वित्त) यांच्या अध्यक्षतेखाली सचिव समिती गठीत करण्यात आली आहे.

(२) सदर समितीचा अहवाल प्राप्त व्हावयाचा आहे.

(३) होय.

(४) व (५) सदर समितीचा अहवाल प्राप्त झाल्यावर त्याचा विचार करुन पुढील उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

-----------------

## नागपूर येथील अवैध अवजड वाहतूक रोखण्याबाबत

**(७६) * ३५२९७ श्री.गिरीशचंद्र व्यास :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पूर्व विदर्भात विशेषत: नागपूर येथे क्षमतेपेक्षा जास्त माल वाहतूक होत असून त्यात गिट्टी, वाळू, मुरूम, गौण खनिज यांची वाहतूक करणाऱ्या वाहतूकदारांकडून प्रादेशिक परिवहन विभाग अंदाजे रूपये ४ कोटीची अवैध वसूली करीत असल्याचे दिनांक ५ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने क्षमतेपेक्षा जास्त अवजड होणारी अवैध वाहतुक रोखण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिवाकर रावते :** (१) हे खरे नाही.

(२) पूर्व विदर्भातील क्षमतेपेक्षा जास्त मालवाहतूक करणाऱ्या वाहनांवर प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर (ग्रामीण) व प्रादेशिक परिवहन कार्यालय, नागपूर (शहर) यांच्या वायुवेग पथकामार्फत नियमितपणे कार्यवाही करण्यात येते.

माहे एप्रिल, २०१७ ते ऑक्टोबर, २०१७ या कालावधीत एकूण २७७९ एवढी वाहने तपासण्यात आली असता त्यापैकी ६६८ वाहने दोषी आढळली आहेत. सदर दोषी वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यात येवून वाहनांच्या चालक/ मालक यांच्याकडून रुपये १,३३,३१,५५० एवढा दंड वसूल करण्यात आलेला आहे. तसेच २३७ वाहनांची अनुज्ञप्ती निलंबित करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## किणी (ता.भोकर, जि.नांदेड) येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात पशुवैद्यकीय अधिकारी उपस्थित राहत नसल्याबाबत

**(७७) * ३५५८६ श्री.अमरनाथ राजूरकर, श्री.संजय दत्त :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) किणी (ता.भोकर, जि.नांदेड) येथे पशुवैद्यकीय श्रेणी-२ चा दवाखाना असूनही दवाखान्यांचा कारभार शिपाई व मिश्रक यांच्याकडे असून येथील पशुवैद्यकीय अधिकारी नांदेडहून कारभार पाहत असल्याचे माहे सप्टेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर दवाखाना सद्य:स्थितीत गोडाऊन मध्ये सुरू असून पंचायत समितीने सदर दवाखान्यासाठी नवीन इमारत बांधलेली असून त्या इमारतीत वीज पुरवठा नसल्यामुळे दवाखाना नव्या इमारतीमध्ये स्थलांतरीत करण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने दवाखान्यात पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांना पूर्ण वेळ उपस्थित राहण्यास सूचना देण्याबाबत तसेच नव्या इमारतीला वीज पुरवठा करुन तेथे सदर दवाखाना स्थलांतरीत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.महादेव जानकर :** (१) हे खरे नाही,

पशुवैदयकीय दवाखाना किणी, ता.भोकर, जि.नांदेड हा श्रेणी-२ चा दवाखाना नसून श्रेणी-१ चा दवाखाना आहे. या दवाखान्यातील पशुधन विकास अधिकारी हे पद दिनांक ३१/०३/२०१६ ते दिनांक २२/०६/२०१७ या कालावधीमध्ये पदोन्नतीमुळे रिक्त झालेले होते. त्यामुळे सदर रिक्त पदाचा अतिरिक्त कार्यभार नजीकच्या पशुधन विकास अधिकारी, (विस्तार) पंचायत समिती, भोकर यांचेकडे सोपवून पशुपालकधारकांच्या जनावरांना वैद्यकीय सेवा पुरविण्यात येत होत्या. सद्य:स्थितीत शासनाने सदर रिक्त पदावर दिनांक २२/०६/२०१७ पासून नियमित पशुधन विकास अधिकाऱ्याची नियुक्ती केली आहे.

(२) व (३) हे खरे नाही,

पशुवैद्यकीय दवाखाना श्रेणी-१, किणी, ता.भोकर, जि.नांदेड हा नुतन इमारतीमध्ये दिनांक २०/१०/२०१६ रोजी स्थलांतरीत करण्यात आला आहे. सदर नुतन इमारतीमध्ये विज पुरवठा व इतर आवश्यक सुविधा उपलब्ध आहेत. सद्य:स्थितीत सदर दवाखान्यात नियमित पशुधन विकास अधिकारी कार्यरत असून दवाखान्याचे संपूर्ण कामकाज नुतन इमारतीमधुन सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## परभणी जिल्हयातील रस्त्यांची दुरवस्था झाल्याबाबत

**(७८) * ३५४०७ श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.धनंजय मुंडे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) परभणी जिल्हयातील रस्त्यांच्या दुरवस्थेबाबत लक्ष घालून जिल्हयातील रस्त्यांची कामे करण्यात यावी तसेच पुरेसा निधी उपलब्ध करून देण्यात यावा याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर रस्त्यांच्या कामांसाठी पुरेसा निधी उपलब्ध करून देण्याबाबत तसेच, रस्त्यांची कामे पूर्ण करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२) प्रश्नाधीन रस्त्यांची कामे मंजुरी व निधीच्या उपलब्धतेनुसार करण्यात येत आहेत.
(३) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## राज्यातील देवस्थानच्या जमिनी वहिवाटदारांच्या नावे करण्याबाबत

**(७९) * ३५३४२ श्री.आनंद ठाकूर, श्री.हेमंत टकले, श्रीमती विद्या चव्हाण, श्री.धनंजय मुंडे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.किरण पावसकर, डॉ.अपूर्व हिरे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील देवस्थानच्या जमिनी वहिवाटदारांच्या नावे करण्याच्या संदर्भात दिनांक २३ मार्च, २०१६ च्या शासन निर्णय अन्वये प्रधान सचिव (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास समिती गठित करण्यात आलेल्या समितीने शासनाकडे अहवाल सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त अहवालातील शिफारशीचे सर्वसाधारण स्वरूप काय आहे व त्या अनुषंगाने शासनाने कोणता निर्णय घेऊन कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने देवस्थानच्या जमिनी वहिवाटदारांच्या नावे करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) राज्यातील देवस्थान जमिनीच्या संदर्भात तत्कालिन मा.राज्यमंत्री (महसूल) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीचा अहवाल शासनास प्राप्त झाला असून, सदर अहवाल शासनास सादर करण्यात आला होता. सदर अहवालातील शिफारशींच्या अनुषंगाने राज्यातील देवस्थान जमिनीसंदर्भात शासनाची भूमिका ठरविण्याकामी शासनास शिफारशी करण्याकरीता या विभागाच्या शासन निर्णय क्र. जमीन-२०१६/प्र.क्र.१००/ज-१, दिनांक २३/३/२०१६ अन्वये प्रधान सचिव (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली “अभ्यास समिती” गठीत करण्यात आली आहे. सदर समितीची कार्यकक्षा खालील प्रमाणे आहे:-

अ) राज्यातील विविध भागातील देवस्थान जमिनींच्या वापराची सद्य:स्थितीचा अभ्यास करून देवस्थान जमिनींचे झालेले बेकायदेशीर हस्तांतरण व वापरात बदल या विषयी उपाययोजना सुचविणे.

ब) शहरी भागातील देवस्थान जमिनींच्या वापराचा अभ्यास करून अशा जमिनीचा पुढील विनियोग व वापर आणि व्यवस्थापन करण्यासंबंधी शिफारशी करणे.

सदर समितीकडून या विषयाबाबतचा सर्वंकष अभ्यास सुरू असून, त्याबाबतचा समितीचा अहवाल प्राप्त व्हावयाचा आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## सोलापूर जिल्ह्यात सोलापूर-हैद्राबाद राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचे कामाला गती देण्याबाबत

**(८०) * ३५५२० श्री.रामहरी रुपनवर, श्री.संजय दत्त, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.हरिसिंग राठोड, श्री.शरद रणपिसे :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यात सोलापूर-हैद्राबाद या राष्ट्रीय महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम गत दोन वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून सुरु असून या महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामाला गती नसल्यामुळे जागोजागी मोठे मोठे खड्डे पडून प्रत्येक महिन्यात ५ ते ६ जणांचे बळी जात आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी करून सदर ठिकाणी मोठ्या प्रमाणात होणारे अपघात लक्षात घेता सदर महामार्गावरील खड्डे बुजविण्यासोबतच या महामार्गाच्या चौपदरीकरणाच्या कामाला गती देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रकांत पाटील** : (१) व (२) भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत सोलापूर ते हैद्राबाद हया राष्ट्रीय महामार्ग ९ च्या कि.मी. २४९/०० ते कि.मी. ३४८/०० हया १०० कि.मी. रस्त्याचे चौपदरीकरण जून, २०१४ मध्ये खाजगीकरणाच्या माध्यमातून हाती घेतलेले असून नोव्हेंबर, २०१७ अखेर ५५ कि.मी. रस्ता चौपदरीकरणाचे डी.बी.एम. पर्यंत बांधकाम पूर्ण झाले आहे. सुधारीत नियोजनाप्रमाणे डिसेंबर, २०१८ अखेर काम पूर्ण करण्याचे नियोजन आहे असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, सोलापूर यांनी कळविले आहे.

हया महामार्गावर चौपदरीकरणाच्या कामामुळे ६ ठिकाणी रस्त्याचे मार्ग वळविण्यात आलेले आहेत, सन २०१७ मध्ये हया रस्त्यावर ४ प्राणांतिक अपघात झालेले असून त्यामध्ये ५ व्यक्ती मयत झाल्या आहेत, असे अप्पर पोलीस महासंचालक (वाहतुक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाने कळविले आहे.

(३) शेतकरी संघटनामार्फत झालेल्या आंदोलनामुळे दिनांक १२/०१/२०१५ ते ०७/०९/२०१५ हया कालावधीत चौपदरीकरणाचे काम बंद होते. तसेच भूसंपादनामधील त्रुटींमुळे विलंब झाला असून सद्य:स्थितीत सर्व निवाडे पारीत करण्यात आलेले आहेत. तथापि, इपीसी कंत्राटदारांकडून कामाची अपेक्षित गती न राखल्याने भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाने सवलतकारास करारनामा संपुष्टात आणणेबाबत दिनांक २७/०७/२०१७ रोजी नोटीस दिली असून जानेवारी, २०१८ मध्ये आढावा घेऊन कामाची अपेक्षित गती न राखल्यास करारनामा संपुष्टात आणण्यात येणार असल्याचे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, सोलापूर यांनी कळविले आहे.

-----------------

## डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथील रोजंदारी कर्मचाऱ्यांच्या "समान काम समान वेतन" देण्याबाबत

**(८१) * ३५६०७ श्री.गोपिकिशन बाजोरीया :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथील रोजंदारी कर्मचाऱ्यांनी "समान काम समान वेतन" या मागणीसाठी माहे सप्टेंबर, २०१७ पासून आमरण उपोषण सुरू केले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने सदर रोजंदारी कर्मचाऱ्यांना "समान काम समान वेतन" देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.पांडुरंग फुंडकर :** (१) होय.

(२) राज्यातील कृषी विद्यापिठाच्या प्रक्षेत्रावर काम करणाऱ्या रोजंदार मजुरांना कामावर घेणे, मजुरी अदा करणे, कामावरुन कमी करणे इ. बाबी डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला यांचे स्तरावरुन हाताळल्या जातात. त्यामुळे सदर प्रकरण हे विद्यापीठ स्तरावरील असून कार्यवाहीसाठी विद्यापीठ हे सक्षम आहे. तसेच सदर उपोषणे दिनांक ०६/१०/२०१७ पासून मागे घेण्यात आलेली आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**         **डॉ. अनंत कळसे**
**नागपूर.**         **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मुद्रणालय, नागपूर.